# माणूस

बुधवार । १० फेब्रुवारी ७१ चाळीस पैसे


श्री

स. न. वि. वि.

कै. चारींच्या मृत्यूची दखल घेऊन आपण एक उत्तम व्यक्तिचित्र सादर केलेत, धन्यवाद! श्री. फाटकांसारख्या अप्रसिद्ध श्रममहर्षीची 'माणूस'मधून ओळख करून दिलीत, अभिनंदन! कै. नाथ पै, कै. दलाल यांच्यासंबधी एकही ओळ न देऊन 'माणूस'नं 'आमच्या'वर काही अन्याय केलाय असं आपल्याला वाटत नाही काय? क. लो. अ. हे. वि.


नाना काकिर्डे
ग्रा. क्र. १६९३
के ४५ बेस्ट क्वार्टर्स
डॉ. एस. एस. राव रस्ता
परळ–मुंबई १२
२ फेब्रुवारी ७१


६ फेब्रुवारी १९७१ चा अंक पाहून अभिप्राय कळवावा ही विनंती. —संपादक

बुधवार १० फेब्रुवारी १९७१

# माणूस

| | | |
|---|---|---|
| वर्ष : दहावे | संपादक | सहाय्यक |
| अंक : साठावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर |
| | | सौ. निर्मला पुरंदरे |
| किंमत | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| पस्तीस पैसे | तीस रुपये | साठ रुपये |


## सप्रेम नमस्कार....

□ 'माणूस'मध्ये लोकसभा मुदतपूर्व निवडणुकाविषयी विशेष सविस्तर माहिती वाचावयास मिळते. त्यामुळे अत्यानंद वाटतो. ही माहिती देताना आपले व दुसऱ्याचे असे दुजाभाव न ठेवता सर्वांगिण चर्चा मुक्तपणे मांडलेली असते.

पण २७ जानेवारी १९७१ च्या अंकात 'गुजरातचा गड गडगडतो आहे' या सदरातील दादुमियाँचा लेख वाचल्यानंतर मन खिन्न झाले, मनास फार वाईट वाटले.

दादुमियाँचा लेख हा नेहमी कमी दर्जाचा असतो. 'गुजरातचा गड गडगडतो आहे' ह्या लेखामध्ये मोरारजी देसाईंचेबद्दल फार खालच्या दर्जाचे शब्द वापरले आहेत. सदर लेखामधील काही वाक्ये उदाहरणादाखल द्यावयाची झाली तर 'मोरारजींच्या पाठीत लाथ हाणून बाईंनी त्यांना समज दिली की'; 'मोरारजींचे दारुबंदीप्रेम भारतभर सर्वत्र प्रसिद्ध आहे, मात्र मोरारजी स्वत: रोज दारू पितात, त्याशिवाय का ते एवढे लालबुंद ह्या वयात दिसतात'; 'दारू आली की बाई पाहिजेच' ही वाक्ये वाचली की दादूमियाँच्या लिखाणाची पातळी आणखी घसरली आहे असे वाटते. कुठल्याही माणसावर, पुढाऱ्यावर टीका करावी, पण त्याला काही मर्यादा पाहिजे

आणि असल्या प्रकारचे खालच्या दर्जाचे लेख 'माणूस' देत असल्याचे पाहून 'माणूस' आपल्या लोकप्रियतेस कुठेतरी खीळ तर बसवून घेणार नाही ना? अशी राहून राहून शंका वाटते. तरी यापुढे सदर प्रकारचे लेख छापण्याचे टाळावेत.

२८ जानेवारी, १९७१

मोहन दत्तात्रय पल्ली,
सुनिल दत्तात्रय पल्ली, सोलापूर.

द्विसाप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' द्विसाप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

माझा जाहीरनामा

# माझ्या अपेक्षांची थोडीफार पूर्ती करू शकणारा पक्ष नवकाँग्रेस हाच आहे–

अनंत अंबादास कुलकर्णी, काँटिनेंटल प्रकाशन, पुणे

आमच्या काही अपेक्षा आहेत. या अपेक्षांना त्यातल्या त्यात जवळ असणारा कार्यक्रम जाहीर करणारा व त्या अपेक्षा पुऱ्या करण्याची हमी देण्यास आज समर्थ असलेला पक्ष आम्हास निवडून यावयास हवा आहे.

अन्न, वस्त्र आणि निवारा याबाबत सामान्य व कमी मिळकतीच्या गरीब माणसालाही सुखी करू शकणारा तो पक्ष असेल.

गरजू पालक आणि शिकाऊ विद्यार्थी यांना अनुक्रमे आपल्या पाल्यांसाठी आणि स्वत:साठी हवे असलेले आणि हवे तेवढे शिक्षण सहज मिळेल अशी प्राथमिकपासून परदेशीय उच्च शिक्षण देणारी शिक्षण-व्यवस्था देशभर उभी करणारा पक्ष हवा. 'सब घोडे बारा टक्के' न होता बुद्धिमंतांना योग्य वाव मिळावा. उच्च शिक्षणासाठी परदेशी जाणाऱ्या विद्यार्थ्याला सर्व सोयी उपलब्ध व्हाव्यात हे जसे खरे तसे परदेशी जाऊन शिक्षण पुरे करणारा विद्यार्थी पुन्हा मायदेशी परत आलाच पाहिजे आणि त्याने मिळविलेले ज्ञान स्वत:च्याच राष्ट्राचे सामर्थ्य वाढविण्यात खर्ची केले पाहिजे असा कायदेशीर आग्रह हवा. अन्यथा लहानाच्या मोठ्या केलेल्या बुद्धिमानांच्या पिढ्यांमागून पिढ्या आपला देश गमावून बसेल. आज तरी आपल्या देशाला सर्व क्षेत्रातील ज्ञानी तज्ज्ञांची गरज आहे. याबाबतचा वैश्विक दृष्टिकोन मान्य नाही, व्यक्ति-स्वातंत्र्यही मान्य नाही.

करमणुकीबरोबर ज्ञान व अभिरुची यांची कदर केली जाईल व मानवी जीवन समृद्ध केले जाईल असा आग्रह वाङ्मय, कला, क्रीडा वगैरे क्षेत्रात धरला जावा. असा अट्टाहास धरणाऱ्या व्यक्ती व संस्था यांना सहाय्य व संरक्षण मिळावे. कलेच्या नावाखाली हीन अभिरुची वाढविणाऱ्या साहित्य, कला, क्रीडा आदींची गय होऊ नये. राज्यशकट सांभाळू म्हणणाऱ्या पक्षाला या अभिरुचीची जाण असावी.

लायक आणि गरजू माणसाला त्याच्याजोगता कामधंदा मिळाला पाहिजे. शिक्षित, वयात आलेली आणि काम करण्यास तयार असलेली माणसे बेकार राहून चालणार नाही याची चाड पक्षास असली पाहिजे.

जातीयता, वशिलेबाजी व लाचलुचपत यांचे समर्थ हाताने उच्चाटन व निर्दालन करणारी शासनसंस्था उभी करणारा राजकीय पक्ष आज देशास हवा आहे.

सनदशीर व न्यायाने वागणाऱ्या कुठल्याही व्यक्तीस, संस्थेस वा समाजास आपले आयुष्य निर्भयपणे व मानाने जगता आले पाहिजे. गुंड, नोकरशाही वा पुढारी यांचा उपद्रव रास्त कामास होता कामा नये. शासन किंवा न्यायालय आणि सर्वसाधारण व्यक्ती यांच्यामध्ये कोणत्याही राजकीय पक्षाने लुडबुड करता कामा नये. हे पथ्य पाळणारा पक्ष आज संस्था व समाज यांना हवा आहे.

भेसळ, लांडीलबाडी, विश्वासघात, काळाबाजार, फंदफितुरी, बेकायदा वर्तन करणारास जबर शासन हवे. ही घातकी प्रवृत्ती तात्काळ नाहीशी करणारा पक्ष आज आम्हास हवा आहे. ही घातकी प्रवृत्ती आज कैक वेळा पाठीशी घालून प्रकरणे दडपलेली दिसतात आणि त्यामुळे सभोवती असुरी संपत्तीचे थैमान चाललेले आढळते.

लेखणी आणि वाणी याबाबतचे पुरेसे व्यक्तिस्वातंत्र्य हवे हे तर खरेच पण स्वतःच्या देशाची, धर्माची आणि संस्कृतीची विटंबना आणि मानहानी बिनदिक्कतपणे करण्यास धजणारे करंटे अशा स्वातंत्र्यातून निपजता कामा नयेत. शासकीय गुपिते शत्रुराष्ट्राला पुरविणारे देशबुडवे निर्माण व्हावेत असे फळ जर या स्वातंत्र्याला येणार असेल तर ते कापून मापात आणलेले बरे. शासनकर्त्या पक्षाला लेखणी आणि वाणी याबद्दलच्या अती स्वातंत्र्याचा धोका ओळखता आला पाहिजे.

आपल्या शेतीप्रधान देशाच्या शेती व शेतकरी या दोन्ही बाबी अजून बऱ्याचशा दुर्लक्षित आहेत. त्याकडे खऱ्या अर्थाने अधिक जवळून लक्ष पुरविण्यास हवे आहे. या कामात मिळणाऱ्या सवलती व सहाय्य त्यांच्या हाती वेळेवर व विनासायास मिळते की नाही हे मायेने पाहणारा पक्ष आज आम्हास हवा आहे.

सहकारी सोसायटया, को-ऑपरेटिव्ह बँका, बी-बियाणे आणि खते यांचे होणारे वाटप या गव्हाणीतून बसलेली कुत्री हाकून देणारा पक्षच राष्ट्राचे भले करू शकेल असे आम्हास वाटते.

श्रमिक शेतकरी-कामकरी वर्गाचे वेतन, आरोग्य, करमणूक, स्वास्थ्य वगैरे हक्क कल्याणकारी कायद्याने जोपासता जोपासता तो कामगार कामसू, आज्ञाधारक व तज्ज्ञ कसा होईल, आपल्याला मिळणाऱ्या वेतन व सोयींच्या बदल्यात तो कामाचे माप पदरात पुरेसे टाकतो किंवा कसे हे दक्षतेने पाहिले गेले पाहिजे. अन्यथा तो कामचुकार, उर्मट व क्रियाहीन होईल. स्वतःचे नुकसान तर तो करून घेईलच पण त्याबरोबर कारखाना आणि राष्ट्रधन याबाबतही तो घातकी ठरेल. आम्हास हव्या असलेल्या पक्षाने राष्ट्राच्या या शक्तीला हक्काबरोबर कर्तव्याची शिकवण दिलीच पाहिजे. कर्तव्यापासून वंचित करून घातकी प्रवृत्तीला चालना देणारा या कामगारांच्या मागे असलेला तथाकथित पुढारी वेचून काढून ठेचून टाकणारा पक्षच आज राष्ट्रीय उत्पन्न वाढवू शकेल आणि महागाईचे भूत जमिनीत गाडू शकेल.

विज्ञान व प्रकल्प यांची वाढ होण्यासाठी अन्य राष्ट्रांची सोयरीक पत्करावी लागणार आहे. तशी प्रत्येक राष्ट्राला लागतेही पण सगेसोयरे जोडताना लाचारी पत्करावी लागू नये. त्या संबंधापायी आज अपेक्षित असलेला धाकुटेपणा समजू शकतो पण आहारी जाऊन पत्करलेला भ्याडपणा सहन केला जाणार नाही. अन्यथा त्या विज्ञानाची व औद्योगीकरणाची दारे अम्मळ उशीरा उघडली गेली तरी चालतील. स्वतःच्या सामर्थ्यावर बळाने उभे राहता आल्यावर महान प्रकल्पांसाठी मिळणारा सोयरा आपणास अधिक बरोबरीने व मानाने वागवील, हे भान राजकीय पक्षास हवे.

कलकत्ता, मुंबईसारख्या मोठ्या शहरांची वाढ थांबविलीच पाहिजे. विकेंद्रीकरण झाले पाहिजे. नवी वसाहत, नवी शहर रचना, नवे उद्योग–कारखाने त्या दृष्टीने उभारले जाण्याची दृष्टी असणारा पक्ष नसेल तर मोठमोठी शहरे परधार्जिण्या माओवादी वा नक्षलवादी यांची भक्ष्ये झाल्याशिवाय राहणार नाहीत.

राष्ट्राचे क्षात्रतेज क्षीण झाल्यासारखे वाटत आहे. नापेक्षा पश्चिम बंगालची अशी दुर्दशा होती ना. क्षात्रतेज वाढवून राष्ट्राचे चौअंगाने संरक्षण करण्यास हवे असलेले सामर्थ्य वाढविणारा पक्ष आज आम्हास हवा आहे. स्पर्धेच्या युगात अण्वस्त्रांची उपेक्षा करून चालणार नाही. मानवता, अहिंसा हे शब्द आपल्या राष्ट्राच्या तोंडी शोभावेत इतके समर्थ राष्ट्र लवकर बनले पाहिजे याचा ध्यास राजकीय पक्षास लागला पाहिजे. यासाठी हवी तेवढीच तटस्थता पत्करावयास लागावी. ती जाणतेपणी पत्करलेली असावी तिचा पत्कर दुर्बलतेतून जन्मलेला नसावा.

परराष्ट्रीय धोरण व राष्ट्रीय संरक्षण यांच्याशी निगडीत असलेले काही घनिष्ट प्रकल्प व व्यवसाय तेवढेच राष्ट्रीय व्हावेत राष्ट्रीयीकरणाच्या नावाखाली सामान्य दुकानदारी पत्करली जाऊ नये. अशा दुकानदारीने राष्ट्रीय धन वाढणार तर नाहीच पण असले व्यवसाय चराऊ कुरणे होतील.

आपल्या राष्ट्रास एक राष्ट्रीय भाषा आणि समान कायदा हवाच याचा आग्रह धरणारा आणि या दोन्ही गोष्टी तत्काळ अमलात आणण्याची पाऊलवाट धरणारा पक्ष आमच्या पाठिंब्यास पात्र ठरेल.

या राष्ट्रात विद्यार्थी विद्यार्थ्यासारखा, शिक्षक शिक्षकासारखा वागला पाहिजे. व्यापारी नेक असला पाहिजे, शासन सौजन्यशील, नागरिकास मदत करणारे न्याय्य पण तितकेच रास्त धाक बाळगावयास लावणारे असले पाहिजे. प्रत्येकास व्यक्तिगत व्यवसायधर्म आचरीत असता समाजाचे व राष्ट्राचे कल्याण पाहावयास शिकविले पाहिजे. या देशाचे वकील, डॉक्टर्स, एंजिनिअर्स आपापला व्यवसायधर्म पाळणारे पाहिजेत. म्हणजे वैयक्तिक धर्म, अर्थ, काम आणि प्रवृत्ती यांची जोपासना करता करताच या देशातील राष्ट्रीय धर्म, राष्ट्रीय धन, राष्ट्रीय उद्योग आणि राष्ट्रीय प्रवृत्ती यांचे पालन व संवर्धन झाले पाहिजे. तेव्हा खऱ्या अर्थाने राष्ट्रधर्म

शिकविणारा पक्षच या देशाला वाचवू शकेल.

दिवसेंदिवस गर्तेत जाऊ घातलेला देश वाचवावयास हवा असेल तर समर्थ शासन आणि कार्यक्षम व दक्ष नोकरशाही उभी केली गेली पाहिजे. राष्ट्रधर्माचे तत्त्वज्ञान लोकशाही पद्धतीने सांगणारी व अमलात आणणारी ज्ञानी मंडळी यासाठी एकत्र आली पाहिजेत. या मंडळींनी विचार आणि आचार यात विसंगती निर्माण होऊ देता कामा नये. वैयक्तिक मालमत्तेचे संरक्षण व रास्त संवर्धन करू दिले गेले पाहिजे आणि ते इष्ट टप्प्यावर थांबविताही आले पाहिजे. नाहीतर राष्ट्रीय धनही कमी कमी होत जाईल. शंभर बाजारबुणगे जमवून कार्यविक्षेप होण्यापेक्षा जरूर तेवढ्या कार्यप्रवण लोकांनी राष्ट्राचे मार्गदर्शन केलेले बरे. आमदार, खासदार, उपमंत्री, राज्यमंत्री, मंत्री यांच्या संख्येला जेवढी कात्री लावता येईल तेवढी लावून राष्ट्रीय धनाची उधळमाधळ थांबवावी. वयैक्तिक कर भरण्यात पहिला नंबर ही काही अभिमानाची बाब नाही. दिवसेंदिवस हा बोजा कमी झाला पाहिजे.

शासनाला सर्वोच्च न्यायालयाचा धाक असलाच पाहिजे. सर्वोच्च न्यायालय शासनकर्त्यांच्या प्रगतीवरची धोंड आहे असे म्हणणारे एक भ्रमिष्ट तरी असावेत किंवा त्यांना शासनाचा खरा धर्म तरी कळलेला नसावा.

पंडित नेहरूंनी समाजवादी समाजरचनेचा अंगिकार करून शासनकर्त्या कॉंग्रेस पक्षातर्फे ती अंमलात आणण्याची ज्यावेळी घोषणा केली त्यावेळी प्र. सो. पा. आणि सं. सो. पा. वगैरेसारख्या पक्षांनी कॉंग्रेसमध्ये पुन्हा प्रवेश करण्याचा शहाणपणा वेळीच दाखविला असता तर आज देशाचे चित्र खचित चांगले दिसले असते. कॉंग्रेसमधली ज्येष्ठ पिढी आपोआपच बाजूला सारली जाऊन त्याऐवजी नवी पिढी इंदिराबाईंबरोबर काम करू लागताना दिसली असती. मतभेद झाले नसते. कॉंग्रेसचे विभाजन टळले असते आणि आजची अस्थिर परिस्थिती निर्माण झाली नसती. इंदिराबाईंना कम्युनिस्टांच्या पाठिंब्याकडे पाहावे लागले नसते.

आजही असेच वाटते. या महान देशाची लोकशाही सुरक्षित राहावी आणि देश सधन होत जावा असे वाटणारे सारे जर पक्षनिष्ठेची चौकट अम्मळ ढिली करून एकत्र आले तर संकट टळेल आणि आमच्यासारख्या सर्वसाधारण नागरिकाला अभिप्रेत असलेले जीवन या देशात उपलब्ध होईल.

मी जेव्हा या विचाराने निरनिराळ्या पक्षांचा आणि त्यांच्या निवडणूक जाहिरनाम्यांचा हिशोब करू लागतो त्यावेळी मला वाटते—

माझ्या मते माझ्या अपेक्षांची थोडीफार पूर्ती करू शकणारा आणि माझ्या मतांशी जराचसा जवळ असणारा आजचा पक्ष नवकॉंग्रेस हाच आहे. अर्थात या पक्षाचे शुद्धीकरण व उदात्तीकरण मी येथे अपेक्षित धरलेले आहे. काळाच्या ओघात ठेचा खात खात हा माझा पक्षच हे शिकेल आणि देशाला उन्नत करील.

□ □ □

१० फेब्रुवारी १९७१

# वाघोबाचा डायनिंग हॉल : भामरागड

प्रभाकर मगरे

आमचे आनंद निकेतन महाविद्यालय म्हणजे एक छोटेसेच परंतु मस्त विद्यालय. आनंदवनासारख्या प्रेरणादायी संस्थेशी निगडीत असलेले. निसर्गाच्या रम्य वातावरणात राहणारे आम्ही विद्यार्थी शांत खरेच पण. नागपूर पुण्यापासून बरेच दूर असल्यामुळे जागृतीतही तितकेच मागे. तरीही काही विद्यार्थी मात्र राष्ट्रीय भावनेने प्रेरित झालेले. राष्ट्रासाठी काही तरी केले पाहिजे या ज्वलंत विचार-सरणीने पछाडलेले; पण–मार्ग माहीत नसलेले! जवळ जवळ १४० विद्यार्थी आणि प्राचार्य रॉय यांच्यासहीत ५ प्राध्यापक. उत्स्फूर्तपणे आम्ही राष्ट्रीय सेवा योजनेत सामील झालो. सेंबळसारखे एक छोटेसेच गाव; पण तिथे आम्ही प्रेमाचे, सौहार्दाचे नाते जोडले. त्यांच्यासाठी करता येईल ते ते सर्व काही आम्ही करण्याचा प्रयत्न केला. विद्यार्थी आणि समाज यात समनानुयोग (communication) साधणे हा जो राष्ट्रीय सेवा योजनेचा एक महत्त्वाचा उद्देश–; तो साध्य करण्याचा आम्ही प्रयत्न केला. अर्थात हा प्रयत्न तितकासा यशस्वी जरी ठरला नाही, तरी यातून आमच्या युवक-मनाला समाजकार्याची एक वेगळी दिशा लाभली–हेही नसे थोडके.

राष्ट्रीय सेवा योजनेचे वार्षिक शिबिर आम्ही 'सोमनाथ' येथे दिनांक २ ते ९ जानेवारीपर्यंत आयोजित केले होते. सोमनाथच्या ऐवजी एखादे संबळसारखेच खेडे आम्हाला घेता आले असते; पण आमच्या महाविद्यालयाचे संस्थापक श्रमर्षी बाबासाहेब आमटे यांचे सोमनाथमधील नवशिक्षणाचे कार्य यांच्याशीही विद्यार्थ्यांचा परिचय व्हावा या एकमात्र उद्देशाने आम्ही सोमनाथ निवडले. दिनांक २ जानेवारी १९७१ ला सुमारे १०४ विद्यार्थी आणि पाच प्राध्यापक सोमनाथ शिबिरासाठी वरोऱ्यावरून रवाना झालो.

सोमनाथ! चांदा जिल्ह्यातले एक नवे कर्मतीर्थ. चांदा जिल्ह्यातली जी काही शेकडो देखणी स्थळे निसर्गाच्या कुशीत लपून आहेत त्यापैकीच सोमनाथ हे एक. चांदा जिल्ह्यातल्या हजारो एकराच्या निबिड, घनदाट, अरण्यात सोमनाथ वसले आहे. उंचच उंच अशा आम्रवृक्षांच्या छायेत आणि दोन खडकांच्या मधल्या अर्ध-चंद्राकार घळीत एक नाजुकसा झरा वाहत असतो. त्याचे शेजारी आहे एक शिवा-लय आणि त्याला लागूनच साहेब लोकांसाठी एक आधुनिक बंगला. या घनदाट जंगलात पाठीशी पाण्याचा एक सुंदर प्रपात घेऊन सोमनाथ वसले आहेत. समोर एकीकडे हिरवागार निसर्ग आणि दुसरीकडे साग, मोह आणि कळकांच्या रांगा यामधून वाहणारा 'नलेश्वर' तलावातून काढलेला तो कालवा! निसर्गाने आपल्या राजस सौंदर्याची बरसात सोमनाथवर किती मुक्त हस्ताने केलेली आहे? याला

लागूनच आहे ही मूलची शेतकी शाळा. शेतकी शाळेची हद्द संपताच जंगलच्या राज्याची हद्द सुरु होते. अगदी No Man's Land! वाघोबाचा तर हा 'डायनिंग हॉल' आहे. पलीकडे सुमारे साठ हजार एकर किर्र घनदाट जंगल. दोघामधील सरहद्द म्हणजे देखील एक डेंजर झोन आहे. तवागोंदी, उंबरी, डोंगरदेवी, सोमनाथ या झऱ्यांनी सारे जंगल गाजत असते. तेलंगण महाराष्ट्राची ही मिलन सीमा आहे. वाघोबाच्या मिशा केव्हा खांद्याआडून हुळहुळतील, रांजीआडून तो उग्र गंभीर रानरेड केव्हा समोर येईल आणि केव्हा त्याच्या डोळ्यातील ठिणग्या चकाकतील याचा काही नेम नाही. नहराच्या काठाकाठाने, धिप्पाड वृक्षाच्या सोबतीने चालत चालत आपण या रमणीय सौंदर्यसृष्टीत प्रवेश करतो.

निसर्गाचे हे रमणीय देखणेपण डोळ्यात साठवीतच आम्ही सोमनाथमध्ये प्रवेश केला. खरे सांगायचे तर आम्ही १०० मुले आणि त्यांचे २०० हात असे झालो. 'संबळ'ला तर निरोप दिला. आता N. Sc च्या बहुतेक उद्दिष्टांना कार्यवाहीत आणण्याचा प्रयत्न मात्र या छोट्याशा शिबिरात झाला. शिबिर वा छावणी म्हटली म्हणजे एक ठराविक 'ब्ल्यू प्रिंट' आलाच. अर्थात तसे काही विशेष नव्हतेच. परंतु आता ओघाओघातच सांगून टाकतो. सकाळी ७ ते ११॥ श्रम; १२ ते १ स्नान वगैरे; नंतर जेवण, आराम, चर्चा आणि सायंकाळी करमणूक. याप्रमाणे होते आमचे ३ ते ९ या सात दिवसातले रोजचे वेळापत्रक.

३ तारखेची सकाळ उमलली आणि संपूर्ण उत्सुक मने कामाला लागली. कुदळ, फावडी घेऊन आम्ही सर्वजण कामावर निघालो. शंकरदादा मिस्त्री, मधुभाई ही मंडळी सोबत होतीच. त्यांनी बांधाच्या कामावर जायला सांगितले आणि काम आखून दिले. बस्स! उत्साहाने आम्ही कामाला सुरुवात केली. कुदळ-फावड्यांचा खणखणाट वेगाने व्हायला लागला, भराभर पाट्या भरल्या जाऊ लागल्या; आमच्या भालप्रदेशावरून स्वेदगंगा वेगाने वाहायला लागली आणि निर्मितीची गाथा याप्रमाणे साकारत राहिली.

आता शिबिर म्हटले की उद्घाटन आलेच. आमचे उद्घाटनाचे प्रमुख पाहुणे 'नागपूर टाईम्स'चे प्रबंध संपादक श्री. अनंत गोपाळ शेवडे. त्यांच्यासोबत 'नागपूर टाईम्स'चे संपादक श्री. देशपांडे हेही पण आले होते. सकाळी काम करते वेळी या मंडळींनी आमच्यासोबत पाट्या पण उचलल्या होत्या...अशी ही श्रमाकडे विधायक दृष्टीनी बघणारी माणसे. उद्घाटनाच्या वेळी प्राध्यापक सुरेश भृगुवार यांनी अनंत रावजीचा सुबोध परिचय करून दिला. आपल्या उद्घाटनपर भाषणात श्री. अनंत-रावजी शेवडे म्हणाले, "भारताच्या उज्वल भवितव्याविषयी मी मुळीच साशंक नाही. भारतीय जीवनादर्शच सर्व जगाला तारील. अत्यंत कठीण परिस्थितीतही भारतीय संस्कृती ताठ उभी राहिली आहे. या विश्वमोहिनी संस्कृतीचे सरक्षण आणि संवर्धन युवकांनीच करायला पाहिजे." भारताच्या सद्य:स्थितीवर विस्तृत

प्रकाश टाकून श्री. शेवडे पुढे म्हणाले, "आज आपणाला सर्व बाजूंनी निष्प्राण आणि निस्तेज वातावरण दिसत आहे. चैतन्यमय नेतृत्वाच्या आम्ही शोधात आहोत. विद्यार्थ्यांना वैफल्य आणि नैतिक अध:पतनातून वाचविण्याचा प्रयत्न जेथे होतो अशा संस्थांचे आम्ही स्वागतच करू. राष्ट्रीय सेवा योजनेकडे आम्ही याच आशेने पाहत आहोत. आपल्या भाग्याने आपणाला मनुष्य जन्म मिळाला आहे. या सुसंधीचा फायदा घेऊन आपण या नरदेहाचे सार्थक करायला पाहिजे. आज आपला आपणच आदर्श होऊ या. नेते आपणाला प्रकाश दाखवीत नसतील तर आपणच आपला नंदादीप तेवत ठेवू या. 'सूरज डूब गया तो क्या ? माटीका दिया तो मनुष्य को प्रेरणा देता ही रहेगा.' तुमच्या जीवनातील ही इवलीशी प्रेरक ज्योतच इतरांच्या हृदयातील ज्योतीला तेवत ठेवील. आत्मविन्मुख होऊन आत्मसामर्थ्य वाढविण्याचा तुम्ही प्रयत्न केला पाहिजे."

श्रमसंस्कार छावणीचा हा जगन्नाथाचा रथ रोज रोज पुढे ढकलला जात होता. येथे शिस्त केव्हाही लादली गेली नाही. शिस्त होती ती आमची आम्हीच स्वीकारलेली. धाक होता तो आमच्या मनाचा. कुणाच्याही व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा येण्याचा प्रश्नच नव्हता. स्वातंत्र्य होते पण स्वैराचाराचे किळसवाणे रूप त्याला आले नव्हते. एखाद्या स्नेहसंमेलनासारखे शिबिराचे वातावरण सातही दिवस उत्साहपूर्ण होते. मन प्रसन्न ठेवणाऱ्या चैतन्याने शिबिर सर्वत्र गजबजून गेल्यासारखे वाटत होते. दिवस कसा उगवायचा अन् केव्हा अस्ताला जायचा हे देखील कळायचे नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही कुदळ-फावडे उचलून पुनश्च कामाला सुरुवात केली. पहिल्या दिवसापेक्षा दुप्पट उत्साहाने. काही वेळाने बाबादेखील पाहणी करण्यासाठी म्हणून आले. आम्ही दुप्पट जोमाने काम करायला सुरुवात केली. काही वेळाने बाबांच्याभोवती आम्ही सर्वांनीच 'घेराव' घातला. चंद्रपूर जिल्ह्यात जवळ जवळ दहा हजार वर्षांपूर्वीपासून नांदत आलेल्या एका आदिम संस्कृतीबद्दल बाबा बोलायला लागले. सिरोंचा तालुक्यातील भामरागड याठिकाणी राहणाऱ्या लोकांबद्दल अतीव अशा तळमळीने बाबा बोलत होते आणि त्यांच्या बोलण्यातील ती अर्थगर्भ माहिती ऐकून आमची जिज्ञासाही ते चाळवत होते.

संध्याकाळी बाबांनी या विषयावर आमच्याशी खुल्लमखुल्ला 'बात चित' केली. भामरागडच्या परिसरातील या आदिम जातीच्या लोकांसंबंधी बोलताना बाबा म्हणालेत...' कधी कधी मी एकटा असतो...भीतीने एकाकी पडलेला असतो, मला वाटते मी निर्वासित आहे...जखम दिसत नाही पण घायाळ मात्र असतो. सुख दुःख कळत नाही...पण जगातलं हे अवती भोवतीचं दुःख पाहून मी निराश मात्र होत नाही...माझ्या मनाच्या गाभाऱ्यात मी प्रवेश करतो...अंतर्मुख होतो आणि मग माझ्या या मौनाला अंकूर फुटून सारे प्रश्न भराभर सुटतात...पतन, उत्थान आणि

पृष्ठ ५१ वर

sांस्कृतिक मुंबई

रवींद्र पिंगे

# गायनाचार्य पलुस्कर चौक

अफाट मुंबईत प्रचंड वाहाते चौक एकूण पाच आहेत. फ्लोरा फौन्टनचा हुतात्मा चौक, बोरीबंदर स्थानकासमोरचा पार्सिजराचा चौक, दादर टी. टी. चा गृहस्थ मंडळींचा चौक, माटुंग्याचा मद्रदेशीयांचा महेश्वरी चौक आणि गिरगावातला ऑपेरा हाऊसचा चौक. पैकी पहिल्या चारही चौकांवर नव्या नावाच्या पाट्या लागलेल्या आहेत. पाचवा ऑपेरा हाऊसचा चौक अजूनपर्यंत अनामिकच राहिला होता हे एक आश्चर्यच म्हणायचे. मुंबईतल्या जुन्यात जुन्या अशा ज्या लोकाश्रयी वास्तु आहेत, त्यापैकी चौपाटीच्या रस्त्यावरली ऑपेरा हाऊस ही एक प्रमुख वास्तु आहे. पूर्वी राज्यकर्त्या गोऱ्या मंडळींच्या आणि त्यांच्या उबदार पंखाखालच्या आंग्लाळलेल्या नेटिव्हांच्या मनोरंजनार्थ विलायतेहून ज्या गोऱ्या नाटक मंडळ्या यायच्या, त्यांना खेळ करून दाखवण्यासाठी, त्यांच्या दृष्ठीने सोईस्कर होईल अशा प्रकारे बांधलेली ही वास्तु गेली शंभर वर्षे लोकरंजनाचे काम करीत आलेली आहे. बालगंधर्वांचा अमृतमधुर गळा सतत तीन तपे ह्याच रंगमंचावर फिरत राहिला. ऑपेरा हाऊसमधला प्रत्येक खेळ नारायणरावांनी हाऊस फुल्लच घेतला. पुढे दिवस फिरले. ज्या रंगमंचावर ते सोन्याचे रत्नजडीत अलंकार घालून मिरवले, त्याच रंगमंचाच्या वरच्या मजल्यावरल्या खोलीत, 'मुलतान्यांकडे गहाण टाकायला अंगावरचे दागिने काढून दे' म्हणत त्यांना स्वतःच्या धर्मपत्नी-समोर धरणे धरावे लागले! बालगंधर्वांच्या भाग्यरवीचा उदयास्त ह्याच ऑपेरा हाऊसमध्ये झाला. बालमोहन आणि नाट्यनिकेतन ह्या दोन्ही कंपन्यांचे हातखंडा खेळ ह्याच ऑपेरा हाऊसमध्ये तुफान गर्दी खेचत होते. स्वा. सावरकरांनीसुद्धा हा रंगमंच आपल्या अमोघ वाणीने गाजविलेला आहे. गेली वीस वर्षे मात्र इथे फक्त

चित्रपटच दाखविले जातात. तेही बव्हंशी हिंदीच. मराठीचा बावटा तिथे फडफडत नाही. ऑपेरा हाऊसच्या समोरच प्रा. देवधरांची संगीतशाळा आहे. पलीकडे पाच पावलांवर एका माडीवर रंगशाळा आहे. कै. दलाल तिथे चित्रे रंगवीत बसलेले असत. त्या चौकाच्या किनाऱ्याने ज्या उंच इमारती आहेत, त्यांच्यात लेखक, कलावंत, नट वगैरे मंडळी राहतात. म्हणजे, ऑपेरा हाऊसच्या चौकावर सांस्कृतिक चळवळीची छाया पडलेली आहे. अशा ह्या ऑपेरा हाऊसच्या ऐसपैस चौकाला आता प्रा. बी. आर. देवधर, वामनराव देशपांडे, नगरपिते सोमेश्वर गोखले, ह्यांनी तगादा लावल्यामुळे 'गायनाचार्य विष्णु दिगंबर पलुस्कर चौक' असे नाव मिळाले आहे. तीस जानेवारीला संध्याकाळी हे बारसे झाले. संगीतक्षेत्रातली बहुतेक ठळक मंडळी पाळणा हालवायला जमलेली होती. अल्पांशाने का होईना, पण गायनाचार्य पंडितजींचे ऋण फेडल्याचा दिलासा सर्वांच्या नजरेत दिसत होता.

इतिहास संशोधक राजवाड्यांनी आधुनिक भारताच्या निर्मितीला हातभार लावणाऱ्या महापुरुषांची जी यादी तयार केली होती, तिच्यात पहिल्या दहा महापुरुषांमध्ये पं. विष्णु दिगंबरांचे नाव त्यांनी अगत्याने गोवले होते. ह्या एकाच दाखल्यावरून विष्णु दिगंबरांची महती कोणत्या दर्जाची होती ह्याची कल्पना यावी. विष्णु दिगंबरांच्या आगे-मागे बढे-गवैय्ये होऊन गेले. पण एकतर ते राजाश्रयी होते, किंवा चक्क बाजारी तरी होते. एक तर ते दरबारात गाणे-बजावणे करीत, किंवा नृत्यांगनांच्या माड्यांवर सारंगी—तबल्याची साथ करीत. ही दोन्ही टोकं पंडितजींना टाळायची होती. त्यांनी तीन ध्येये सतत डोळ्यासमोर ठेविली. एक; स्वतः चारित्र्यशुद्ध कालक्रमणा करून ग्वाल्हेरी गायकीतले अत्युच्च पद भोगायचे. दोन; समाजातल्या इतर मान्यवर मंडळींना मिळतो तो सर्व मान-मरातब्र गवैय्याच्या पेशातल्या एकूण एक कलावंतांना मिळवून द्यायचा. आणि तीन; ज्यामुळे समाजातल्या सर्वसामान्य माणसांना भारदस्त संगीताबद्दलचा लळा उत्पन्न होईल, अशा सर्व संगीतविषयक चळवळी आपल्या निष्कलंक शिष्यांतर्फे भारतभर सुरू करायच्या. पंडितजींना जे साठ वर्षांचे आयुर्मान रामकृपेने लाभले, त्यापैकी ओळीने पन्नास वर्षे त्यांनी ह्या तिपेडी ध्येयपूर्तीसाठी अर्पण केली.

पंडितजींचा जन्म १८ ऑगस्ट १८७२ रोजी कुरुंदवाडास एका किर्तनकाराच्या पोटी झाला. २९ ऑगस्ट १९३१ रोजी मिरजेला त्यांची जीवितयात्रा संपली. म्हणजे साठ वर्षे ते जगले. दारूकामाचा स्फोट झाल्यामुळे बाळपणात त्यांचे डोळे अधू झाले. तेव्हा उपजीविकेसाठी गाणं शिकलेलं बरं, म्हणून ते मिरजेला पंधराव्या वर्षी राजाश्रयाला आले. येताना फार उच्चीचा मुहूर्त त्यांनी धरला असणार, कारण एरव्ही मिरजेत, ग्वाल्हेर गायकीचे दक्षिण भारतातले पहिले खलिफा पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकरांची नि त्यांची भेट घडून गुरुशिष्याचे अतूट नाते निर्माण होतेच ना! उत्तरेत जाऊन ग्वाल्हेरी गायकीचे धन घेऊन महाराष्ट्रात

परत आलेले पं. बाळकृष्णबुवा हे पहिले थोर गायक, पंधराव्या वर्षापासून चोवी-साव्या वर्षापर्यंत पं. विष्णु दिगंबर मिरजेलाच जेठा मारून पं. बाळकृष्णबुवांच्या पायाप शी बसले. कसबी गवयी म्हणून त्यांची उत्तम तयारी झाली. पण ह्या नऊ वर्षांच्या तपःसाधनेत त्यांच्या एक गोष्ट लक्षात आली की मास्तर, वकील, डॉक्टर, इंजिनियर, सावकार, वगैरे मंडळींना समाजात आणि राजदरबारात जो मान मिळतो, तो गायक-वादकांना अजिबात मिळत नाही! गायकांनी तंबोरे घेऊन कोपऱ्यात उभं राहायचं आणि कुणी गाण्याची फर्माईश केली, तर त्याला रुचेल इतपत गायचं, ही रीतच पडून गेली होती. मानापमानातला हा असमतोल नाहीसा व्हावा म्हणून विष्णु दिगंबरांनी कंबर कसली आणि मिरजेतलं बैठं जीर्ण सोडलं. ते बडोद्याला गेले. तिथले आग्रेवाले राजगवई खांसाहेब फैज महंमद खां (पं. बखलेबुवांचे गुरु) ह्यांचा त्यांनी भर दरबारात पराजय केला. तो शिरपेच खोवून ते राजकोटला गेले. तेथे त्यांनी तिकीटे लावून आपल्या गायनाचा जलसा केला. तोपर्यंत उभ्या भारतवर्षांत कुणी तिकीटे लावून गाणे केलेले नव्हते! सामान्य नागरीक पदरमोड करून गाणे ऐकायला आले ह्याची त्यांना कोण धन्यता वाटली. राजकोट, जुनागढ वगैरे संस्थाने जिंकून ते मथुरेला गेले. तेथे पं. चंदन चौबेंकडे ते धृपद धमाराची विद्या शिकले. वृजभाषाही शिकले. मथुरेहुन भरत-पूरला गेले आणि जलशाच्या अगोदर त्यांनी भाषण केले. तोपर्यंत कुठल्याही गवैय्याने भाषण म्हणून कसे ते केलेले नव्हते! पंडितजी हे भाषण करणारे पहिले गायक. मथुरेहून ते दिल्ली, जालंदर, करीत अमृतसरला गेले. तेथे त्यांनी सर बाबा खेमसींह वेदींच्या मुलांची गाण्याची शिकवणी पत्करली. त्यावेळी गाण्याची स्वर-लिपी लिहिताना स्वरचिन्हेही लिहिली पाहिजेत हे त्यांनी ताडले आणि स्वतःची नवी स्वरचिन्हे तयार केली, जी पुढे सर्व भारतभर मान्यता पावली. पुढे स्वरलेखन मुद्रणाची सोय होईल म्हणून लाहोर गाठले. तिथल्या हिरामंडी मोहल्ल्यात त्यांनी ५ जानेवारी १९०१ रोजी स्वतःचे 'गांधर्व महाविद्यालय' स्थापन करून परिक्षा-पद्धती असलेली भारतातली पहिली गायनशाळा सूरू केली. ह्या महाविद्यालयातर्फे त्यांनी भारतात पहिल्या प्रथम गायनाच्या विद्येतल्या पदव्या स्नातकांना दिल्या, 'संगीतामृत प्रवाह' नावाचे स्वररचना प्रधान मासिक सुरू केले. विद्यार्थ्यांना उपयुक्त व्हावीत म्हणून गायनाची क्रमिका पुस्तके स्वतःच तयार केली. आठ वर्षे पंडितजी लाहोरात विद्यादान करीत होते. नंतर लाहोरची संस्था शिष्यांकडे सोपवून ते मुंबईला गांधर्व महाविद्यालयाची शाखा स्थापन करण्यासाठी आले. १९०८ साली मुंबईत त्यांचे गायनवर्ग सुरू झाले. बायकांसाठी पहिल्याप्रथम पंडितजींनी गायनवर्ग सुरू केले आणि आपल्या पत्नीसकट घरातल्या स्त्रीयांनाही गानशास्त्रप्रवीण केले. पुढे मुंबईत संगीतविषयक पुस्तके छापण्यासाठी स्वतःचा 'संगीत प्रिटींग प्रेस' हा छापखाना काढला, 'म्युझिकल इन्स्ट्रुमेन्टस सप्लाईव

कंपनी ' नावाचा वाद्यांचा कारखाना काढला. वाद्यांचे प्रदर्शन भरविले. स्वरलिपीयुक्त भजनावल्या काढल्या. हे व्याप वाढल्यावर खर्च वाढला. तो मिटविण्यासाठी भारतभर सर्वत्र किर्तनाचे दौरे काढले आणि अपेक्षेबाहेर धन गोळा केलं. हे सारं वयाच्या पंचावनाव्या वर्षापर्यंत केलं. मग त्यांच्या कार्याची पिछेहाट होऊ लागली, संस्थेच्या इमारतीसुद्धा लिलावात निघाल्या. मग ते श्रीराम चिंतनासाठी श्रीक्षेत्र नाशिक येथे गेले. तिथे त्यांनी 'श्रीरामनाम आधार आश्रम' नावाचा आश्रम काढला ! किर्तनं करीतच होते. एका दौऱ्यासाठी ते नेपाळकडे गेले. परतताना कलकत्त्यात आजारी पडले. तिथून नाशकाला परतले. औषधपाणी केलं. गूण पडेना. मिरजकरांनी मिरजेला त्यांना औषधपाण्यासाठी बोलावून घेतलं. ते आले, तेच मुळी पंचतत्त्वात विलीन होण्यासाठी. सतत साठ वर्षे संगीतप्रसाराचा ध्यास घेतलेला त्यांचा देह मिरजेच्या मातीत एकतीस साली शांत झाला.

संगीताचा ध्यास म्हणजे काय जबरदस्त चीज आहे ते पंडितजींच्या झपाटलेल्या जिंदगीकडे पाहिले की ठीक कळते. अनेक गोष्टी, अनेक प्रथा, भारतात त्यांनी प्रथम पाडल्या. तिकिटे लावून जलसा करणारे ते पहिले गायक. भाषणाचे दौरे त्यांच्या अगोदर कलावंतांनी कधीही काढले नव्हते. स्वरलिपीतल्या स्वरचिन्हांचे ते जनक आहेत. उपदेशकांचा काफिला तयार करणारे तेच पहिले. संगीतातल्या पदव्या देणारे, महाविद्यालय काढणारेही तेच आद्य प्रवर्तक. तबला-तरंग हा तबल्यांचा ऑर्केस्ट्रा सादर करणारे पंडितजीच पहिले. 'वंदेमातरम्' गीत सभेत सवाद्य म्हणण्याचा प्रघात विष्णु दिगंबरांनी सुरू केला. 'रघुपती राघव राजाराम' ही रामधून हेच भारताचे राष्ट्रगीत असावे, असा वर्षोनुवर्षे आग्रह धरणारेही तेच पहिले नि शेवटचे रामभक्त ! गायनमास्तरांची पहिली परिषदही त्यांनीच प्रथम


हंसा वाडकर यांचे आत्मकथन

सांगत्ये ऐका


सांगत्ये ऐका

मूल्य आठ रुपये

राजहंस प्रकाशन

घोलावली. आणि, तमाम हिंदुमात्रांचे परम-प्रेमी आणि अतिथोर दे. भ. मौ. महमद अली यांनी तेवीस सालच्या काकीनाडाच्या भारतीय काँग्रेसमध्ये 'वंदेमातरम्' गाण्यास अध्यक्ष ह्या नात्याने बंदी केल्यानंतर त्यांना तिथल्या तिथे बाणेदारपणे ठणकावून, 'वंदेमातरम्' अट्टाहासाने म्हणणारेही पं. विष्णु दिगंबर हेच पहिले! संगीत कलाकारांना सामाजिक प्रतिष्ठा मिळावी आणि जोडीला लोकाश्रयही मिळावा असे स्वप्न पहाणारेही पंडितजीच पहिले आणि शुद्ध चारित्र्याचे दंडक स्वतःच्या आचरणाने घालून देणारेही तेच पहिले व्रती. पं. ओंकारनाथ ठाकूर, पं. शंकरराव व्यास, पं. नारायणराव व्यास, पं. विनायकबुवा पटवर्धन, पं. नारायण-शास्त्री खरे, श्रीकृष्ण हिर्लेकर, वामनराव पाध्ये, असे शिष्योत्तम दुसऱ्या कुठल्या गवैय्याने तयार करून दाखविले? आणि, 'मी इतका संगीतमय झालो आहे की माझ्या हाडांवर टिचकी मारली तरी त्यातून स्वर उमटतील!' असं सांगू शकणारा गवई तरी दुसरा कोण आहे? तेव्हा अशा युगप्रवर्तक गायनाचार्यांचे नाव ऑपेरा हाऊस चौकाला लाभले, हे यथोचितच झाले. पुढले वर्ष हे पं. विष्णु दिगंबरांच्या जन्मशताब्दीचे वर्ष आहे.

जाता जाता : अशा थोर गायकाच्या जीवनाची माहिती देणारे एकही चरित्र मराठीत नव्हते. दिल्लीच्या नॅशनल बुक ट्रस्टने आता पंडितजींचे एक छोटेखानी चरित्र आकाशवाणीचे माजी संगीतनिर्माते आणि महिला विद्यापीठाचे सध्याचे प्राध्यापक श्री. विनायकराव आठवले ह्यांच्याकडून तयार करवून घेऊन मराठीत प्रसिद्ध केले आहे. इतके सुंदर, मार्मिक, रसाळ आणि माहितीपूर्ण चरित्र क्वचितच वाचावयास मिळते. तशात, लेखक श्री. आठवले हे चारही घराण्यांची गायकी जाणणारे आणि गाणारे अधिकारी गायक आहेत. त्यामुळे त्यांच्या लेखणीला मराठीत क्वचितच आढळणारी ज्ञानसिद्ध मीति प्राप्त झाली आहे. पं. दिगंबरांचे हे प्रा. आठवलेलिखित चरित्र म्हणजे संगीतप्रेमी वाचकांना पंडितजींच्या जन्म-शताब्दीच्या मोक्यावर मिळालेली एक आल्हाददायक भेटच आहे.



१० फेब्रुवारी १९७१

# हे कलकत्ता

सौ. तारा पंडित

## ही शांतता ?

बंगालमधील अशाश्वतता जरादेखील कमी झालेली नाही. एका दिवसात चौदा खून पडतात, पाठोपाठ दुसऱ्याच दिवशी पाच खून झाल्याची बातमी येते. ह्या सतत रक्तपाताव्यतिरिक्त इतर भानगडीही उपस्थित होत असतात. उदाहरणार्थ, एवढ्या तेवढ्या कारणावरून बस आणि ट्राम कर्मचाऱ्यांचा लाक्षणिक संप ! जर एखाद्या मोठ्या आणि संघटित युनियनचा सभासद दोषी म्हणून जरी पकडला गेला तरी त्या युनियनचे इतर सभासद ताबडतोब पूर्वसूचना न देताच एकदम काम बंद करतात. हे त्यांचे वागणे शंभर टक्के बेकायदेशीर असते. याचा परिणाम भोगाव लागतो तो सामान्य लोकांना. त्यांना आपल्या कामाच्या स्थळी वेळेवर पोहोचणे शक्य होत नाही आणि त्यामुळे त्यांच्या जीवाचा नुसता संताप होतो. पण अशा-वेळी राज्यसरकार—जे केंद्रीय सरकारचेच प्रतिनिधित्व करीत आहे ते—अगदी थंड असते व प्रचलित परिस्थितीकडे जाणूनबुजून सपशेल कानाडोळा करते.

आणखी एक तसलाच प्रकार कलकत्त्याच्या उपनगरांचे बाबतीत दिसून येतो. रेल्वेच्या वॅगन्सची तोडताड होते आणि मालमत्तेची चोरी होते. परिणामतः कित्येक वेळा उपनगरातून येणाऱ्या गाड्या हावरा किंवा सिआल्दाला येऊच शकत नाही किंवा फारच उशीरा येतात. वास्तविक रेल्वे पोलीस हे केंद्रीय सरकारच्या ताब्यात असूनही चोरांना किंवा गुंडांना पकडण्याचे बाबतीत कुचकामी ठरले आहे. शहरातील शाळा-कॉलेजे बंद पडणे—अगदी बेमुदत बंद राहणे, दुधाचे वाटप वेळचेवेळी न होणे व पिण्याच्या पाण्याचा तुटवडा इत्यादी गोष्टींचीही त्यात भर पडते. त्या सर्वांना—सत्य घटना असूनही—नजरेआड केले जाते.

शहरात हिंसक प्रकारांची लाट आली म्हणजे ‘ रायटर्स बिल्डिंगच्या ’ बंद दरवाजांच्या आत एक सभा घेतली जाते नि तेथे ‘ अशा ’ घटनांचे नुसतेच चर्वीचरण चालते. कधीकधी दिल्लीलाही येथील धरणीकंपांचे धक्के बसतात. टेलिफोनच्या तारांमधन संदेश तरी जातात किंवा झकपक पोषाखातील प्रतिनिधी फाईल्स घेऊन धावत जातात. परिणाम मात्र काहीच दिसत नाही एवढं खरं. कारण परिस्थितीत बदलच होत नाही.

## हवा इलेक्शनची

गजबजलेल्या हॉटेलात चहाचे कप समोर नि हातात जळती सिगरेट घेऊन ते दोघे कोपऱ्यातल्या एका टेबलाशी बसले होते. ' टिफिन आवर 'च्या वेळातच जरा मनमोकळ्या गप्पा होऊ शकतात. निवडणुकांचे जंतु घेऊन येणारी हवा यांच्याही अंगावरून जाणार हे ठरलेलंच...त्यांचं संभाषण सुरू झालं—

' काय ठरवलंस तू ?' एकाचा प्रश्न.

' ? ' दुसऱ्याचा प्रश्नार्थक चेहरा.

' निवडणुका आल्याहेत. मत द्यायला जाणार की नाही ?'

' हे काय विचारणं ? मत द्यायला जायला नको ? डेमॉक्रेटिक राज्य आहे ना आपलं. ?'

' एकूण मत द्यायला जाणार म्हणजे बरीच तयारी दिसते तुझी ?'

' कसली तयारी ?'

' मरायची. आणखी कसली ?'

' अरे, मूर्खासारखं काय बोलतोस ! प्रत्येक मतदान केंद्रावर पोलीस राहणार आहेत तेव्हा धोका कसला ? एवढंच नाही, आणखी जास्तीचे पोलीस इतर राज्यांमधून आणले जाणार असं ऐकतोय. तेव्हा घाबरायचं काय कारण ?'

दुसरा मित्र हसला. म्हणाला—

' ते सगळं ठीक रे. पण मतदान केंद्रापर्यंत तरी तू सुरक्षित पोचणार आहेस का ? केंद्रावर पोलिस पहारा राहील हे खरं, पण वाटेत निरनिराळ्या पक्षांचे लोक असतील. पोलीस काय तुला घरापासून केंद्रापर्यंत का सोबत करणार आहेत ? मध्येच डोकं फुटलं म्हणजे ?'

' अरे हो, तेही खरंच. माझ्या हे लक्षातच आलं नाही. पण काय रे, यादीत आपलं नाव आहे की नाही ते पाहून आणि नसलं तर ते रजिस्टर करून घेतलं पाहिजे अशी जाहिरात वाचलीस की नाही तू ?'

' वाचली. पण असलेली नावं काढून कशी टाकायची हे मात्र त्या जाहिरातीत सांगितलेलं नाही. थोडक्यात, मतदान केंद्रासमोर रांगेत उभं राहणंही धोक्याचं अन् मत द्यायला न जाणंही धोक्याचं आहे.'

' अशा वेळी मग एकच मार्ग उरतो.'

' तो कोणता ?'

' आपलं नाव खानेसुमारीच्या यादीतूनच ( Census roll ) काढून टाकावं म्हणजे झालं. कारण त्यावरूनच मतदारांची यादी ( Voters' list ) तयार होत असते.'

...आणि ते दोघे हॉटेलमधून बाहेर पडले. कारण टिफिन अवर संपला होता.

## चहाच्या मळ्यात

आसाममधील चहाच्या मळ्यात काम करणाऱ्या मजुरांच्या बाबतीत कुटुंब नियोजनाचा प्रयत्न अयशस्वी ठरला कारण सरकारने स्त्री–मजुरांना बाळंतपणाच्या खास सवलती देऊ केल्या आहेत. ह्या गरीब स्त्रिया मुलांचे संगोपन बरोबर करू शकत नाहीत; पण केवळ बाळंतपणाच्या निमित्ताने थोडा पैसा हाती येतो व म्हणून त्याचा त्यांना मोह पडतो. शिवाय ती मुलं चवदा वर्षाची होताच त्यांना चहाच्या मळ्यातच कामावर ठेवले जाते. तेव्हा तीही काळजी उरत नाही.

## धावती घोषवाक्ये

कलकत्त्याच्या ट्राम आणि बसेस आपलीच मालमत्ता आहे अशी भिन्न भिन्न राजकीय गटांची समजूत आहे की काय ? तऱ्हतऱ्हेची घोषवाक्ये ठिकठिकाणी, जागा सापडेल तिथे प्रत्येक ट्राम आणि बसवर आतून–बाहेरून लिहून ठेवलेली आढळतात. काही ठिकाणी तर अक्षरे अगदी व्यवस्थित व काळजीपूर्वक लिहिलेली दिसतात. याचा अर्थ असा की ह्यावेळी स्टेन्सिल्स वापरण्यात आल्या असाव्यात आणि स्टेन्सिल्सच्या साह्याने मजकूर लिहायचा म्हणजे बराच वेळ लागणार. ट्राम डेपो व बस गॅरेजमधील अधिकारी वर्गाने याची दखल घ्यायला नको काय ? असल्या कृत्यांना त्यांनी आळा का घालू नये ?

□ □ □


# शिलंगणाचं सोनं

**आवृत्ती : तिसरी**

**ब. मो. पुरंदरे**

**किंमत : तीन रुपये**

**राजहंस प्रकाशन**

निवडणूक मतप्रवाह :

# सिंडिकेट राज्यातील चित्र

वा. दा. रानडे

## बिहार

सिंडिकेट आघाडीच्या किंवा सिंडिकेटच्या हाती सत्ता असलेली उत्तर प्रदेशाशिवाय इतर राज्ये म्हणजे बिहार, गुजरात व म्हैसूर. उत्तर प्रदेशातील निवडणूक परिस्थितीचे विश्लेषण गेल्या अंकातील लेखात केले. आज या तीन राज्यांचा विचार करावयाचा आहे.

लोकसभेत उत्तर प्रदेश खालोखाल ५३ जागा बिहारला आहेत. मणिराम पोटनिवडणुकीत मुख्यमंत्र्यांचा पराभव करून इंदिरा काँग्रेसचा सामान्य उमेदवार विजयी झाल्याने तेथे इंदिरा विजयाचे वारे वहात आहे. पण बिहारमध्ये तशी परिस्थिती नाही. काही बाबतीत उत्तर प्रदेशपेक्षा बिहारचे चित्र निराळे आहे. उत्तर प्रदेशप्रमाणेच बिहारमध्ये गेल्या चार लोकसभा निवडणुकात काँग्रेसचे बळ सतत घटत गेले आहे. १९५२ मध्ये ४५, १९५७ मध्ये ४१, १९६२ मध्ये ३९ व १९६७ मध्ये ३४ जागा काँग्रेसने मिळविल्या. १९६७ मध्ये तर विधानसभेतील हुकमी बहुमत काँग्रेसने गमावले. केवळ जागांच्या दृष्टीने नव्हे तर मतांच्या दृष्टीनेही काँग्रेसची घसरगुंडी वाढत आहे. १९५७ मध्ये ४४·७ टक्के, १९६२ मध्ये ४३·८९ टक्के आणि १९६७ मध्ये ३५·१२ टक्के मते काँग्रेसला मिळाली. १९६९ मध्ये विधानसभा निवडणुकात काँग्रेसने फक्त ३०·४५ टक्के मते मिळवून घसरगुंडीची आणखी खालची पातळी गाठली.

यावेळी काँग्रेस पक्षात फूट पडली आहे. एवढेच नव्हे तर सिंडिकेटच्या नेतृत्वाखाली जनसंघ, स्वतंत्र पक्ष, व संयुक्त समाजवादी यांची आघाडी बऱ्याच मतदारसंघात इंदिरा काँग्रेसशी चुरशीची लढत देणार आहे. गेल्या निवडणुकीत ५३ पैकी ३३ जागा काँग्रेसने ५० टक्क्यापेक्षा कमी मते मिळवून जिंकल्या. म्हणजे काँग्रेस विरोधी मते विभागली गेली नसती तर या जागा काँग्रेसला मिळाल्या नसत्या. या ३३ मतदारसंघांपैकी बगाहा, बेटिया, गोपाळगंज, सिवण, छप्रा, हाजीपूर, सीतामढी, पूर्णिया, कटिहार, राजमहाल, शहाबाद, बक्सर, गया, रांची, खुंटी, या पधरा मतदार संघातच फक्त सिंडिकेट आघाडीतील पक्षांना गेल्या वेळी काँग्रेसपेक्षा अधिक मते मिळाली आहेत. सिंडिकेट आघाडीने या सर्व जागा यावेळी एकजुटीने लढविल्या तर जिंकण्याचा संभव आहे पण तशी शक्यता दिसत नाही. छप्रा मतदार संघात संयुक्त समाजवादी व जनसंघ उमेदवार एकमेकांविरुद्ध उभे आहेत.

याशिवाय भारतीय क्रांतिदलही ही जागा लढवित आहे. याशिवाय हाजीपूर, बेटिया, सिवन, गोपाळगंज व बर्दे या पाच मतदारसंघात भाक्रांदचे उमेदवार सिंडिकेट आघाडी विरुद्ध उभे राहणार आहेत.

इंदिरा काँग्रेसने कम्युनिस्ट, प्रजासमाजवादी व झारखंड (होदो गट) यांच्याशी निवडणूक समझोता करून त्यांच्यासाठी १९ जागा मोकळ्या ठेवल्या आहेत. म्हणजे काँग्रेस ३४ च जागा लढवीत आहे. बिहारमध्ये कम्युनिस्ट पक्षाचे बळ गेल्या चार निवडणुकीत वाढत आहे. १९५७ मध्ये ५.२टक्के, १९६२ मध्ये ६.३८ टक्के, १९६७ मध्ये ९.३५ टक्के व १९६९ च्या विधानसभा निवडणुकीत १०.१० टक्के मते या पक्षाने मिळविली. कम्युनिस्ट व प्रजासमाजवादी पक्षांशी समझोता केल्याने इंदिरा काँग्रेस आघाडी बहुसंख्य जागा मिळविण्याचा संभव आहे. पण त्यात एकटचा इंदिरा काँग्रेसला बहुसंख्य जागा मिळण्याची शक्यता कमी आहे.

सिंडिकेट आघाडीतील पक्षांपैकी जनसंघाला पाठिंबा वाढत आहे. १९५७ मध्ये ०.०८टक्के, १९६२ मध्ये २.३७ टक्के, १९६७ मध्ये ११.१४ टक्के व १९६९ च्या विधानसभा निवडणुकीत १५.६३ टक्के मते या पक्षाने मिळविली. संयुक्त समाजवादी पक्षाने १७.९३ टक्के मते व सात लोकसभा जागा मिळविल्या होत्या पण त्याला पाठिंबा कमी झाल्याचे १९६९ च्या विधानसभा निवडणुकीत दिसून आले. या निवडणुकीत या पक्षाला १३.६८ टक्के म्हणजे जनसंघापेक्षाही कमी मते मिळाली.

असे हे बिहारमधील चित्र आहे. काही थोडया मतदारसंघात सिंडिकेट आघाडी इंदिरा काँग्रेसशी चुरशीची लढत देईल. पण सिंडिकेट आघाडीला बहुसंख्य जागा मिळण्याची शक्यता कमी आहे. इंदिरा काँग्रेसलाही त्या एकटयाच्या बळावर मिळणे कठीण आहे, पण इंदिरा काँग्रेस–डावे गट आघाडीस बहुसंख्य जागा मिळण्याची बरीच शक्यता आहे.

## गुजराथ

गुजरातमध्ये सिंडिकेट काँग्रेसचे सरकार अधिकारावर आहे. सिंडिकेटचे तीन मंत्री व काही प्रमुख कार्यकर्ते फोडण्यात इंदिरा काँग्रेसने यश मिळविले आहे. अनेक ठिकाणी चुरशीच्या लढती होतील यात शंका नाही. गुजरातेत गेल्या चार निवडणुकात काँग्रेसने लोकसभेच्या अनुक्रमे १९, १७, १६ व ११ जागा मिळविल्या. काँग्रेसचे बळ घटत आहे, पक्षातील फुटीमुळे तर ते आणखीच घटले आहे. गुजरातमधील सर्वसामान्य काँग्रेस कार्यकर्त्यास जनसंघ–स्वतंत्र पक्षाशी सिंडिकेटने आघाडी करणे पटत नाही. याचा फायदा इंदिरा काँग्रेसला मिळाल्याशिवाय राहणार नाही.

सिंडिकेट काँग्रेस आणि स्वतंत्र पक्ष यांच्यात निवडणूक समझोता झाला, त्यानुसार राजकोट, जामनगर, धंधुका व गोध्रा या चार जागा स्वतंत्र पक्ष लढविणार आहे. याशिवाय जुनागड व सुरेंद्रनगर मतदार संघातही स्वतंत्र पक्षाचे उमेदवार अपक्ष म्हणून उभे राहतील. स्वतंत्र पक्षाने गेल्या निवडणुकीत गुजरातेत १० जागा मिळविल्या होत्या. पण सिंडिकेट काँग्रेसशी समझोत्यात ६ जागांवरच त्याला समा-

धान मानावे लागत आहे. बाकीच्या १८ जागा सिंडिकेट काँग्रेस लढविणार आहे. स्वतंत्र पक्षास दिलेल्या सहा जागांपैकी राजकोट, जुनागड व गोध्रा या तीन जागा स्वतंत्र पक्षाने गेल्या वेळी ५० टक्क्यापेक्षा कमी मते मिळवून जिंकल्या होत्या. इंदिरा काँग्रेसशी सरळ सामने झाल्यास या जागा जिकणे स्वतंत्र पक्षास कठीण जाईल.

जनसंघाला गेल्या निवडणुकीत एकही जागा मिळाली नव्हती, म्हणून यावेळीही त्याला एकही जागा देण्यास सिंडिकेट आघाडीतील पक्षांनी विरोध केल्याने गुजरातेत जनसंघ आघाडीतून बाहेर पडला असून तो नऊ जागा लढविणार आहे. जनसंघाची मते कमी असली तरी चुरशीच्या लढतीत या थोड्या मतांनाही महत्त्व आहे. ती विभागली गेल्याचा फायदा इंदिरा काँग्रेसला मिळण्याची शक्यता आहे.

गुजरातेतील ही परिस्थिती लक्षात घेता सिंडिकेट आघाडीला तेथे बहुसंख्य जागा मिळविणे सोपे जाणार नाही.

## म्हैसूर

सिंडिकेटचे सरकार असलेले म्हैसूर हे दुसरे राज्य. नुकतीच झालेली जमखंडीची पोटनिवडणूक सोडली तर काँग्रेसमधील फुटीनंतरच्या सर्व पोटनिवडणुका इंदिरा काँग्रेसने जिंकल्या. निवडणुकीच्या ऐन मोक्याला महमदअली व पुट्टस्वामी हे दोन मंत्री फोडण्यात तिने यश मिळविले. सिंडिकेटला हा मोठा हादरा असून तिचा बालेकिल्ला समजला जाणाऱ्या राज्यातच तिचे आसन सुरक्षित नाही. हे या घडामोडींनी स्पष्ट झाले आहे. म्हैसूरमध्ये अविभक्त काँग्रेसने गेल्यावेळी १८ जागा जिंकल्या होत्या. यावेळी अनेक मतदारसंघात चुरशीच्या लढती होतील पण पक्षात पडलेली फूट आणि जनसंघ व स्वतंत्र पक्ष यांच्याशी समझोता करण्यास पक्षातील सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा असलेला विरोध लक्षात घेता लोकसंख्येच्या बहुसंख्य जागा मिळविणे सिंडिकेटला सोपे जाणार नाही.

स्वतंत्र पक्ष १२ व जनसंघही १२ जागा लढविणार आहे. जनसंघाला गेल्या निवडणुकीत एकही जागा मिळाली नव्हती. स्वतंत्र पक्षाला पाच मिळाल्या होत्या.

प्रजासमाजवादी पक्षाचे दोन खासदार निवडणुकीच्या ऐन मोक्याला इंदिरा काँग्रेसने फोडले व त्यांना त्याच मतदारसंघात तिकिटे दिली. त्यामुळे त्या पक्षाचा स्वाभाविक रोष आहे. इंदिरा काँग्रेसने प्रजासमाजवादी पक्षासाठी सहा जागा मोकळ्या ठेवण्याची तयारी दर्शविली होती. पण दुसऱ्या पक्षाचे सभासद फोडण्याच्या इंदिरा काँग्रेसच्या तंत्रामुळे त्यांच्याशी समझोता करण्यास प्रजासमाजवादी पक्षाने नकार दिला. त्यामुळे काही मतदारसंघात प्रजासमाजवादी पक्षाचे उमेदवार सिंडिकेट काँग्रेस व इंदिरा काँग्रेस या दोघांविरुद्धही उभे राहतील. त्याचा फायदा सिंडिकेट आघाडीलाच अधिक मिळण्याचा संभव आहे.

बिहार, गुजरात व म्हैसूर या तीन राज्यांचा एकत्रिक विचार करता तिन्ही ठिकाणी चुरशीची लढत होणार असून कोणत्याच बाजूस बहुसंख्य जागा मिळण्याची शक्यता कमी आहे.


□ □ □

# मयूराऽ! रेऽऽ!

सुशिला अय्यर

....दूर्वांचं 'अक्षय 'त्व चिरपरिचित आहे...उन्हाळा आला की जमीन पार सुकून गेलेली दिसते...इतकी की यापूर्वीची वृक्षराजी मुळासकट नाहीशी झाल्यासारखी वाटावी! ...पण मुळापासून नामशेष झाल्याचा हा आभास फार काळ टिकणारा नसतो...पावसाळा येतो आणि नष्ट झालं असल्याचं भासविणाऱ्या या मुळांना अचानक उधाण येतं...मुळामुळातून कोंब फुटू लागतात...जीव घेतात...जीव धारणेची ऊर्मी नसानसातून वाहू लागते...आणि दाही दिशांनी हिरवंपण रसरसतं...वाऱ्याच्या प्रत्येक लाटेसरसं डोलू लागतं...गात्रागात्रातून जीवनरस भरून आलेला असतो...आणि विस्मित नजरा अधीरपणे पहातच रहातात....'अरे, कालापर्यंतचं हे नसलेपण आज रूप घेऊन आलंय्...!–आनंद आणि आश्चर्य एकच वेळी बोलू लागतं!!'

मास्तर कृष्णरावांच्या 'स्वर-प्रभेचं' असंच झालं...एकेकाळी अनभिषिक्त सम्राटाप्रमाणे संगीतक्षेत्रात राज्य करणाऱ्या स्वर राजाला, स्वर भास्कराला स्वरांचं वैभव, स्वरांचं सामर्थ्य कळलं होतं, झाकळलं होतं तरी त्याला जोडूनच असलेलं २५ वर्षापूर्वीचं या क्षेत्राचं दारुण रूपही उघड्या डोळ्यांनी बघावं लागलं होतं. म्हणूनच स्वतःच्या स्वरांची 'प्रभा' आपल्या मुलीच्या मनावर प्रतिबिंबित होत असलेली दिसत असूनही तशी ती होता कामा नये याची डोळ्यात तेल घालून जपणूक केली गेली...संगीत दिग्दर्शक म्हणून 'प्रभात' कंपनीतील स्वतःच्या ऐन उत्कर्षाच्या विलक्षण भरभराटीच्या काळात जन्माला आलेली म्हणून मुलीचं नाव 'प्रभा' ठेवलं गेलं...रूपही पित्याचंच घेऊन मुलगी जन्माला आली होती...पण स्वतःचं गाणं सोडून बाकी सर्व बाबतीत ती 'आपली प्रभा' असावी ही पित्याच्या मनाची इच्छा!...आपण केलं ते आपल्याला ठीक. पुरुषाला ठीक.!...पण स्त्रियांनी या क्षेत्रात पडायला नको...या क्षेत्रात आनंदाइतकंच दुःख आहे....सुखाइतकाच धोकाही आहे...आपल्या मुलीला गाऊ देऊन चालणार नाही....या मोहमयी नगरीत तिचा प्रवेशही नको–पित्याची माया वरील निसर्गनियमांइतक्या सहजपणे



रामदास कामत चाल ऐकत आहेत

कठोर बनली...अभेद्य भिंत बांधली गेली...कडक विरोध होत राहिला...

...मुलीचं बालमन मात्र तळमळत होतं. रक्तात संगीत घेऊन जन्माला आलं होतं..व्याकुळ होत होतं...काहीतरी निमित्त करून...अगदी त्या काळातील अतिरथी, महारथी कलावंताचा घरी पाहुणे म्हणून आलेले असताना पाहुणचार करायचं निमित्त करून, कधी पित्याला सोबत म्हणून, कुठे गाण्याच्या मैफिलींना जाऊन, कधी पित्याचा रोष पत्करून, तर कधी पित्याला खूष करून, काही ना काही कल्पना योजून भरपूर गाणं ऐकून घेऊ लागलं...आत्मसात करू लागलं... न शिकवता शिकू लागलं...शिकवूनही येणार नाही इतकं गाणं सहजतयाचं उमजू लागलं...संगीताच्या स्वरूपाबद्दल विचार करू लागलं. इतर दोन भावंडं खेळायला निघून गेली तरी खेळ सोडून ह्या मनाचं लक्ष गाण्याकडे!...इतर भावंडांना संगीत आवडत नव्हतं असं नाही पण अतिरिक्त वेड फक्त ह्या मनालाच!

आतिथ्यशील आईने पाटपाणी करायला जिन्यातून हाक दिली तरी प्रभाचं लक्ष नाही....कधी केलंच काम तरी कान तंबोऱ्याच्या नादाकडे!...तबल्याच्या तालाकडे!...सूर कसा उमटत जातो ह्याच्या अभ्यासाकडे...असे कितीतरी दिवस जात राहिले...

—शालेय शिक्षण संपलं—कॉलेजचं शिक्षण सुरू झालं आणि इंटरला असताना अचानक लग्न ठरलं...सासरी संगीताला स्थान कितपत याची चौकशी कुणी केली

नाही–कराविशी वाटली नाही!–उलट न करणंच अधिक उचित, हितकारक वाटलं...कलावंताची मुलं म्हणून ती कधी वाढवली गेलीच नाहीत; कलावंतपणाहून माणूसपणाचं महत्त्व त्या घरात अधिक! त्या बाळबोध वळणात वाढलेल्या प्रामाणिक, निष्पाप मनालाही 'आपण लग्न होऊन सासरी जायचंय्' एवढच त्यावेळी कळत होत...पुढे कसा काळ उभा राहणार याची कल्पना नव्हती–पती श्री. चिटको–अत्यंत सरळ, सालस, सज्जन मन...चांगल्या हुद्याची नोकरी... संसार सुरू झाला...प्रभाची 'वीणा' झाली. पण संसार संगीतातली सारी सुखं अनुभवूनही मन हुरहुरतच राहिलं...

–१० वर्षांचा कालखंड उज्जयिनीजवळ दूर कुठेतरी अगदी एकाकी गावात–नागद्याला!...गद्य जीवन व्यतीत करणं आलं...दोन मुलं...पती...आणि स्वतः ह्या पलीकडे सामाजिक हितसंबंध अनंत असले तरी संगीतिक हितसंबंध कुठलेच नव्हते...पतीचं प्रेम कळत होतं...त्याच्या प्रेमाची मित्रमंडळी हीही आपलीच 'प्रेमाची माणसं' हेही कळत होतं...पण लहानपणापासून भावना एकच!... गायक लोक हे खरे आपले नातेवाईक! हिराबाई बडोदेकर, सरस्वती राणे, रामभाऊ मराठे, माणिक वर्मा, पु. ल. देशपांडे ही सारी खरी 'घरची माणसं, वाटत...एवढं कशाला...प्रत्यक्ष पित्याकडेही पिता म्हणून बघण्यापेक्षा एक कलावंत म्हणूनच अधिक प्रमाणात लक्षात घेणारं हे मन होतं...मग हे कलाप्रेम गप्प बसू देणारं नव्हतं....

वृत्तीतील कलात्मकतेचा आविष्कार या ना त्या स्वरूपात प्रगट होत राहिला... कधी बाटिक वर्क करण्यात...कधी मूर्ती बनविण्यात, क्ले मॉडेल्स तयार करण्यात, कधी पेंटिंग करण्यात तर कधी लाकडी वस्तू, फ्रेम्स वगैरे बनविण्यात...पण हे सारं करीत असतानाही गळा गुणगुणतच राहायचा...अगदी गमतीदार स्वरूपात स्वर पुढे उभे रहायचे!...स्वरांच्या विविध प्रकारच्या मोहक संगती कुठूनतरी कानांना ऐकू आल्यागत वाटायच्या...कधी डोळ्यांपुढे स्वच्छ उभ्या राहायच्या... रेडिओवर गाणं ऐकलं की डोक्यात विविध कल्पनाचं काहूर उठायचं–हे असं किती छान जुळतय्...नाही, हे असं असायला नको होतं...त्यापेक्षा हे असं असतं तर अधिक खुलून दिसलं असतं...सारखे काही ना काही विचार मनात चालूच असायचे...

लहानपणी मोठमोठे कलावंत ऐकायला मिळाले होते...अल्लादिया-खाँसाहेबांचे चिरंजीव कै. भूर्जीखाँ, कै. रजबअलीखाँ साहेब, मरहूमफैय्याज खाँसाहेब, पाध्येबुआ, कै. लक्ष्मीबाई जाधव, कै. बालगंधर्व–असे एक ना दोन...कितीतरी कलावंत ऐकलेले!...किती शिकवून गेली होती ही माणसं!...सांगीतिक आशयाची समृद्धी या साऱ्यांकडून भरल्या मापाने अनुभवलेली...सांगीतिक सौंदर्यदृष्टी किती सुसंपन्न बनवली त्यांनी!

—साऱ्या आठवणी डोळ्यांपुढे उभ्या रहायच्या...डोळ्यात पाणी घेऊन समोरची भकास पोकळी बघत असतानाच एकेकवेळी अंधुक दिशा सापडायची. क्लबमध्ये काही कार्यक्रम आहे म्हणून गीत-गायचं असे...मग 'वीणा चिटको'च हे काम करू शकतील या विश्वासाने लोक यायचे—मग कधी गीतं रचली जाऊ लागली... तर कधी तयार गीतांना चाली लावल्या जाऊ लागल्या...मध्यंतरी निखिल बॅनर्जी-सारख्या प्रख्यात सतारवादकाकडे शिक्षण घेण्याचं भाग्य लाभलं होतं. त्याचा फायदा होऊ लागला...अधूनमधून सतारवादनाचेही कार्यक्रम होत...लोक 'सतारवादक कलावंत' म्हणून ओळखत होते. त्यांना आता वीणाताई संगीतदिग्दर्शिकाही आहेत हे कळू लागलं...तेवढ्यापुरत लाभणारं स्वर सान्निध्य मनाला सुखवून जाई ..

...आणि अचानक उत्तर हिंदुस्थान सोडून मुंबईला येण्याचा योग आला. चिटको साहेबांनी नोकरी सोडायचं ठरवलं—अगदी झीज सोसूनही! मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न होता. आणि पत्नीमधल्या कलावंताचं अस्सल रूप साऱ्या सुरात कुठंतरी आर्तता घेऊन अवतरत होतं! आणि मुंबईला आल्यावर अगदी आगळ्याच रूपात नवं जीवन उभं राहिलं...आजवर मनात घोळवलेली वीणाताईंची कल्पना मूर्त स्वरूप घेऊन साकार झाली...वीणाताईंनी बांधलेल्या सुंदर सुंदर चाली रामदास कामतांनी ऐकल्या. वीणाताईंसारख्या गुणी कलावंताने कुठेतरी कोपऱ्यात पडून रहावं व जगाने त्या चालीतील सौंदर्याला, त्यातील सांगीतिक आनंदाला वंचित व्हावं हे कामतांना पटेना...वीणाताईंनी रचलेल्या व चाली दिलेल्या गीतांचं वेगळेपण, त्यातलं आगळं गुणसौंदर्य, त्याची मौलिकता कामतांना गप्प बसू देईना, त्यांनी ती सारी गीतं आत्मसात केली. त्यावर खूप मेहनत घेतली आणि त्यांना अमेरिकेला जाण्याचा योग आला तेव्हा तिथं ती गीतं त्यांनी काही सभांमधून गाऊन दाखवली. कोणी विचारे, या चालींमध्ये मास्तर कृष्णरावांचा भास होतो. तुम्ही त्यांच्याकडे गाणं शिकता का? कामत हसत आणि सांगत—'नाही, ही गीतं त्यांच्या कन्या वीणा चिटको ह्यांनी रचलेली आहेत.'

खरं तर मध्यंतरीचा १० वर्षांचा कालखंड पित्याच्या सहवासाला जवळ जवळ पूर्णतया' चुकलेला...तरीही पित्याच्या काही खास वैशिष्ट्यांचा मागोवा घेत जाणारा हा सांगीतिक सौंदर्य विचार होता. पित्याने जरी मुळात कडक विरोध केलेला असला तरी कित्येक वेळा असे प्रसंग यायचे की आपल्या कन्येचं 'मत' आपल्या संगीत रचनेबद्दल काय आहे हे त्यांना विचारावसं वाटे! सुरुवातीला त्यांना कल्पनाही नव्हती तिला गाणं समजू शकतं याची! एकदा त्यांना गायचं होतं आणि ऐनवेळी साथीचे ऑर्गनवादक गैरहजर! आणि मुलगी म्हणाली 'मी साथ करू का?'—पित्याला आश्चर्य वाटलं. पण त्याचबरोबर गंमतही वाटली 'बघू या तर खरं काय न् कशी वाजवते ते?' असं म्हणून त्यांनी तिला परवा-

पृष्ठ ४० वर

# ' असे हे आगळे सीमोल्लंघन '

**प्राचार्य मो. वि. माळी**

१० ऑक्टोबर १९७०. विजयादशमीचा शनिवार. जोडून आलेला रविवार. असे रजेचे एकत्र आलेले दोन दिवस मनात भरतात आणि महाविद्यालयाच्या कार्यालयातील कंटाळवाण्या कामातून सुटका करून घेऊन सत्कारणी लावण्याचा ते तगादा करतात. मन बहरते आणि भटकायला कुठेतरी बाहेर पडायचे ठरवते.

महाडच्या परिसराचा नकाशा छात्रसेनेच्या कचेरीतून आणला जातो आणि कुठून कुठे कसे भटकता येईल याची योजना सुरू होते. योजना आकार घेते व शेवटी पक्की होते. मग सुरू सहकाऱ्यांचा शोध. 'तू येतोस का ? तुम्ही येणार ना ? चला हो ' ची भाषा सुरू होते. एकूण सहा जण तयार होतात. शेवटपर्यंत दोन गळतात. आणि ९ ऑक्टोबरच्या दुपारपर्यंत अनिश्चित असणारा एकजण ऐनवेळी येतो म्हणतो. प्रा. खांबेटे, प्रा. तारदाळकर, प्रा. इंगोले, श्री. दिलीप मुकादम आणि मी असे पाचजण शुक्रवारी ९ ऑक्टोबरला महाड–जिते बसमध्ये बसतो. प्रा. खांबेटे आणि श्री. दिलीप मुकादम तर बस सुटता–सुटता जेमतेम बसमध्ये चढतात.

ही बस आम्हाला सायंकाळी ६ वाजता निजामपूरला (कोष्टे) सोडते. एक खाणावळीने मेणबत्तीच्या प्रकाशात पुरवलेले तिखट बेचव अन्न पोटात रिचवतो, चांदण्यात थंड हवेत गप्पा गोष्टी करतो आणि रात्री शाळेत वस्ती करतो.

विजयादशमीला सकाळच्या ५॥ च्या मुहूर्तावर कुंभ्याचे प्रस्थान ठेवतो. वाटाड्या मिळावा म्हणून केलेले आदल्या संध्याकाळचे सर्व प्रयत्न फुकट जातात आणि आम्ही सर्वजण रस्ता विचारीत विचारीत कुंभ्याचा मार्ग आक्रमू लागतो.

बोरवाडीपर्यंतचे ४ मैलाचे अंतर एका झपाट्यात १॥ तासात तुटते. सुरुवातीला

**प्राचार्य मो. वि. माळी म्हणजे डोंगरवेडा माणूस. कुलू, मनाली या भागातून फिरलेला. सह्यगिरीचे अनेक डोंगर चढलेला. 'हनुमान शिखर चढाईचा' उपनेता. 'त्रिशूळ' चढाईचा नेता. गिरिशिखरांची 'साद' आली म्हणजे प्राचार्यांची खुर्ची सोडून रानावनात भटकायला जाणारा गृहस्थ. गेल्या दसऱ्याच्यावेळी स्वारीला लहर आली आणि निजामपूर, बोरपाडी, मांजरणे, कुंभे, कावळाखिड, सांदोशी, बिरवाडी हा ३०-४० मैलांचा डोंगरी मुलूख त्यांनी दोन दिवसात पायाखाली घातला. रिपरिपत्या पावसात. रपरपत्या चिखलातून. शेवाळलेल्या डोंगरदऱ्यातून. या भ्रमंतीचे हे वर्णन...**

ओहोळानी अनेक ठिकाणी रस्ता तोडलेला असतो. पहिल्या पहिल्याने ओहोळातील पाण्यापासून पाय आणि बूट सुके ठेवण्याची धडपड चालते. जास्तीत जास्त लांब उडी मारून बूट सुके ठेवले जातात. त्यात एकाचा पाय घसरतो आणि बूट वाचविण्यापायी तो नखशिखांत ओला होतो. पण मग एकाहून एक मोठे ओहोळ आडवे येतात आणि आतापर्यंत केले परिश्रम फुकट घालवतात आणि एकदा बूट ओले झाल्यावर आम्हाला पाण्याचा धाक उरत नाही. बिनदिक्कतपणे पाणी तुडवायला लागल्यावर आमच्यातले पाणी पाण्याला समजते आणि ओहोळही कमी होतात. रस्ता चढणीला लागतो. बोरवाडी येते.

गावात चहाचे दुकान नसतेच. बोरवाडी सोडल्यानंतर दिवसभरात चहा मिळण्याचा संभव नसतो. म्हणून चौकशी अंती, एका खाजगी घरात चहा मिळण्याची सोय असते, तिकडे जातो. बिस्किटांबरोबर चहा पिता पिता समोरून शाळेत जात असलेली छोटी मुले दिसतात. हातात सरस्वती काढलेल्या पाट्या, आणि रुमालात बांधलेले तांदूळ, फुले, उदबत्त्या. एकदम लहानपणची आठवण येते. जुने वातावरण डोळ्यापुढे येते. माझ्यावेळी सर्वात चांगली सरस्वती ज्याची असेल त्याला गुरुजी बक्षिस देत आणि बक्षिस मिळविण्यासाठी आम्ही आदल्या रात्री मोठ्या मुलांकडून उत्तम सरस्वती काढून घेत असू.

बोरवाडीतून मांजरण्याला जायचे असते. गावातला एकजण आम्हाला रस्ता दाखवण्यासाठी बरोबर येतो. आम्ही नको म्हणत असतानाही तो आस्थेने बराच दूरवर येतो. फुटीर फाट्यानी आम्हाला फसवून आडवाटेला लावू नये ही त्याची

सदिच्छा. तो आणखी थोडा चालतो आणि आम्ही वाममार्गाला लागणार नाही याची खात्री पटल्यावर तो निरोप घेतो.

आता चढणीला सुरुवात होते. वेग बराच मंदावतो. सात-आठशे फूट वर येतो. थोडी सपाटी लागते. विश्रांती घेता घेता समोरचे विलोभनीय दृश्य पहात राहतो. दूर ढगांचा दाट कापशी पट्टा, लहान लहान डोंगर दऱ्यांवर पसरलेला असतो. त्यांची शिखरे त्यामधून डोकावत असतात. बोरवाडीच्या सद्‌गृहस्थाची सदिच्छा तोकडी पडते आणि आम्ही मांजरण्याचा रस्ता चुकून बुऱ्या मार्गाला लागतो. जवळच असलेल्या गुराख्याला, 'हीच ना वाट मांजरण्याची ?' हे विचारल्यावर ते उमगते. आम्ही मागे वळतो आणि मांजरणे जवळ येते.

कुंभ्याच्या डोंगरदऱ्यांच्या कुशीत वसलेल्या मांजरण्याला फारच उत्कृष्ट पार्श्वभूमी लाभलेली असते आणि गाव आटोपशीर अन् टुमदार वाटते. मध्ये माडाचे उंच गेलेले एकमेव मोठे झाड आणि त्याचा शेव धरून भोवती वर्तुळात ५० कौलारू घरे ठाकठीक उभी असतात. समोरच प्राथमिक शाळा मांडलेली असते व दसऱ्यासाठी सजून आलेली मुले लक्ष वेधतात. चवथीपर्यंतच्या या शाळेत पटावर ४० मुले असतात आणि सरासरी हजेरी ३४ असते. गावातले मास्तर सोडून सगळे 'रणपिसे' नावाचे. 'रणपिसे' असलेली ही सर्व माणसे असतात मात्र रानपिशी! कपड्यानी अर्धवट झाकलेली आणि श्रमानी वाळलेली !

गावाच्या वेशीवरच गवत कापण्यासाठी निघालेला एक रणपिसे भेटतो. 'रामराम' होते आणि 'गावात काकडी मिळेल का ?' हा स्वार्थी प्रश्न आम्ही त्याला विचारतो. 'हायेत की' 'मग देणार का आम्हाला एखादी' 'अहो एक काय, चार खाक की'

'चला तर मग.'

'वाइच थांबा. मी गवत कापून लगीच येतो.'


'अरे आम्हाला थांबायला वेळ नाही.'

'मग जा गावात. कुणीही देईल काकड्या.'

'अरे, महाडहून आम्ही मुद्दाम तुमच्या गावाला आलोय. आणि तू म्हणतोस गवत कापेपर्यंत थांबा म्हणून. गावात आमच्या ओळखीचे कुणी नाही. आणि तुझी सर इतरांना येईल का ?' हा युक्तिवाद त्याला पटतो म्हणा किंवा आमची सौदेगिरी लक्षात येऊनही, आपला चांगुलपणा का सोडा, असा कळत नकळत विचार करून म्हणा, तो माघारी फिरतो. आम्ही त्याला त्याच्या कामापासून खेचतो आणि आमच्या तैनातीसाठी गावात आणतो. तो काकड्या आणतो. आम्ही त्या चवीने खातो. पैसे घेण्याचे तो नाकारतो. लाजेखातर आम्ही त्याच्या मुलांना थोडा खाऊ देतो आणि बैठक आवरती घेतो. कुंभ्याकडे वळतो.

कुंभे गाव आणखी १००० फूट उंचीवर असते. कुंभ्याला जाणारी डोंगराच्या

## सीमोल्लंघनाचा मार्ग




कुशीतून वळत वळत चढणारी पाउलवाट आम्ही पकडतो आणि आस्ते आस्ते वर चढतो. खिडीच्या तोंडाशी येऊन चढणारी वाट काळकाईच्या देवळाला प्रदक्षिणा घालून सपाटीला लागते. चढाईने दमछाक झालेला गडी काळकाईच्या देवळानजीक बूड टेकतो आणि विश्रांती घेतो.

शेजारी वहात असलेला रम्य ओढा मात्र नजरेआड रहातो. तो जेव्हा दृष्टिपथात येतो तेव्हा मात्र डोळ्यात आणि मनातही भरतो आणि आम्हाला आपल्याकडे ओढीत नेतो. दर्शनानेच आमच्यापैकी प्रत्येकजण हर्षभरित होतो. हुरळलेला प्रत्येकजण दुसऱ्याची पर्वा न करता कपडे काढतो आणि स्वतःला पाण्यात झोकून देतो. धबधब्याखाली यथेच्छ नहातो. डोक्यापासून पायापर्यंत मालीश करून घेतो आणि

नंतरच इतर पाण्यात आहेत की बाहेर आहेत ते पहातो.

आम्ही पाण्यात डुंबत असतो आणि कुंभ्याचा एक वृद्ध गृहस्थ हे सर्व तृप्त मनाने पहात असतो. त्याच्या डोळ्यात आनंद साठवलेला दिसतो. पूर्वाश्रमीचे स्वच्छंद-पणाचे दिवस तो आठवीत असावेसे दिसते. त्याला आम्ही विचारतो, 'आजोबा, या नदीचे नाव काय हो?' 'अहो, गांवढ्या गावातल्या अशा नद्यांना कसली आली आहेत नावं? आम्ही आपले हिला व्होळ (ओहोळ) म्हनतो.'

आम्ही सकाळची थंड वेळ असूनही, तासभर पाण्याशी खेळत रहातो आणि मग नाइलाज म्हणून ते समाधान आटोपते घेतो. कुंभे एक मैल दूर असते. तिथे पोचायला ११॥ वाजतात. पाटलाचे घर विचारीत एका घरापाशी पोचतो. म्हातारी, पोक्त, तरुण नी मुले मिळून २०–२५ माणसे एव्हाना 'पाहुण्यां'ना बघायला जमतात. 'यवढ्या दूर कशापायी येनं केलं.' एक म्हातारा विचारतो. 'सहज गाव बघायला.' 'या आमच्या गावात बघण्यासारखं काय हाये?' दुसरा एक समवयस्क म्हणतो, 'अवो कायतरी धोरन असल्याबिगर मोठी मानसं इक्तं दूर येत नसत्यात. प्हानी करायची असंल, कुठ पानी आडवायची जागा ठरवायची असंल.'

आम्ही सर्वजण आपापल्या परीने त्यांना पटवण्याचा प्रयत्न करतो की, आम्ही फक्त डोंगर, नद्या, गावे वगैरेंनी नटलेला निसर्ग पाहण्याकरिता आणि भटकण्याचा आनंद लुटण्यासाठी फिरतो आहोत. पण हे त्यांना पटत नाही. मोठी माणसे काही कामाशिवाय वेळ दवडतील हे त्यांना असंभवनीय वाटते. यात काही कावा असल्याची त्यांना शंका येते. त्यांना पटवून देण्याचा आमचा खटाटोप व्यर्थ जातो. आणि शेवटी आम्ही त्यांना सांगतो, 'अहो, आम्ही वेडे फकीर आहोत. आला वेडाचा झटका आणि वाटले तुमची भेट घ्यावी.' हेही अर्थातच त्यांना पटत नाही. आणि मग आमच्यापैकी प्रत्येकाला बाजूला नेऊन खाजगीत विचारले जाते. खाजगीतली गोष्ट कुणालाही सांगितली जाणार नसल्याचा निर्वाळा ते देतात. आमच्यासारखेच त्यांचेही हे प्रयत्न विफल ठरतात.

मात्र तिथल्या अर्ध्या तासाच्या बैठकीची प्राप्ती चांगली होते. पाटील चहा करतात. एकजण दाट ताकाचे मोठे मडके भरून आणतो. चहानंतरही आम्ही ताक अधाशासारखे पिऊन टाकतो. त्यांना पैसे देऊ करतो पण पैसे कुणीही घेत नाही. कुंभ्यातले हे निरपेक्ष आदरातिथ्य आम्हाला हेलावून सोडते आणि अद्यापही काही खेडी सुधारली नाहीत याबद्दल समाधान वाटते.

कुंभे हे ३००–३५० वस्तीचे गाव असते. गावात मराठी चवथीपर्यंतची शाळा असते. सध्या शाळा बंद असते. कारण गुरुजी गेले १५ दिवस कुंभ्यात नसतात. एका शुक्रवारी, सोमवारी येतो म्हणून जे सांगून जातात त्यानंतरचा एक सोमवार जातो, दुसरा जातो आणि तिसरा दोन दिवसावर येतो तरी गुरुजींचा पत्ता नसतो. आम्ही म्हणतो, 'गुरुजी देशावर गेले असतील आपल्या घरी.' 'नाही हो. गुरुजी

हायेत कोकनातले जवळपासचे. देशावरला मास्तर ठाम बसतो येऊन. अन् पोरं २–४ यत्ता शिकत्यात तरी.'

आम्ही कुंभ्याहून 'जोर'ला जायचे व नंतर कावळा खिंडीतून सांदोशीला उतरायचे सांगतो. गावकरी ते अवघड आणि बरेच लांबचे मकाण असल्याचे सांगतात आणि पायवाट 'लई द्राड' असल्याचे म्हणतात. त्याऐवजी गारजाईला जाऊन कावळा खिंडीत उतरणे सोपे, असे मत देतात. मधली कुंभाखिंड आम्हाला सापडणे कठीण–म्हणून तिथला एक वाटाड्या घेऊन गावकऱ्यांचा निरोप घेतो.

दुपारी एकचा सुमार होतो. आकाशात भरपूर ढग जमतात. पावसाची वाढती चिन्हे आम्हाला सोबत करतात. आम्हाला वाटेला लावून वाटाड्या परतणार असतो. म्हणून त्याच्या पायांना भिंगरी लागते. आम्हालाही संध्याकाळपर्यंत सांदोशीला पोचायचे असते. म्हणून त्याच्या गतीला आम्ही साथ करतो. रस्ता डोंगरांच्या मधून असतो. दोन्ही बाजूचे डोंगर खुरट्या गवताने हिरवटलेले असतात. मधून ओहोळ सर्पगतीने वहात राहतो.

तीनच्या सुमारास पाऊस गळायला सुरुवात होते. त्याने जोर धरल्यास आम्ही रेनकोट काढणार असतो पण टिपकणारा पाऊस गती वाढवीत नसतो. आम्ही मात्र झपाट्याने रस्ता कापीत रहातो. या दोन तासात ओहोळाच्या काठावर दोन वेळा बैठकी जमतात. १५–२० मिनिटांच्या. खाणे, पिणे, थट्टा-मस्करी होते. पण रस्ता संपण्याची घाई असते. सावकाशीने निसर्गसानिध्याचा आनंद चघळायला वेळ नसतो.

साडेतीनचा सुमार होतो. एका डोंगराला वळसा घालतो आणि समोर एक रमणीय दरी उघडते. दोन्ही बाजूंना, डोंगरमाथे हिरव्या मखमली टोप्या घालून स्थिरावलेले असतात. तासलेल्या डोंगरकडामधून धबधबे जागोजाग उड्या घेत राहतात. खाली दरीतून नदीचा चिंचोळा वेडावाकडा काळपट प्रवाह संथपणे झुळझुळत असतो.

आमचा वाटाड्या आम्हाला गारजाई गाव दूरवर दरीपलीकडे दाखवतो. समोरच दिसत असलेल्या गारजाईला दरीतून मार्ग नसतो. डोंगरांच्या बाजूने लांबचा वळसा घालून पोचावे लागते. हा वळसा आम्हाला एकदीड तासाचा हिसका देणार असतो आणि दिवसाच्या अखेरीस आलेली ही उतरण-चढण चांगली दमछाक करून टाकणार असते.

वाटाड्याबरोबर आम्ही थोडे अधिक पायपीट करतो आणि वाटाड्या बुजतो. त्याला गारजाईला उतरायची पाऊलवाट सापडत नसते आणि शोधून शोधूनही जेव्हा तो गोंधळतो तेव्हा म्हणतो, 'खरं म्हणजे हितं वाट अशी नाहीच. आपलं पाऊल टाकीत, चाचपडत, नाकासमोर गारजाई ठेऊन, चालत जायचं. आहो ही डोंगरी वाट. यंदा गारजाईहून इकडं कुणी विशेष आलंच नाही. म्हणून वाट बुजली.' वाटाड्याला परतायची घाई झालेली असते. त्याच्या गोंधळातून त्याने स्वतःसाठी

चांगला मार्ग काढलेला असतो.

मी दृष्टीक्षेप टाकतो आणि अजमावतो की वाटेशिवाय खाली उतरणे काही विशेष धोकादायक नसते. त्याला वाटेला लावतो आणि आम्ही आमच्या वाटेला लागतो. गवतातून आंधळेपणाने घसरत आम्ही उतरणीला लागतो.

पावसाची चिन्हे अधिक जवळीक करू लागतात. विजा बेंबीच्या देठापासून कडाडतात. जमीन आणि मने हादरतात. पावसाचे टपोरे थेंब कोसळू लागतात. लगेच पावसाची लांबलचक मोठी सर येते व आम्हाला चांगले न्हाऊ घालते. रेनकोट काढण्याची उसंतच देत नाही आणि त्यामुळे पूर्ण भिजलेले पदयात्री नंतरच्या पावसाला भीत नाहीत ! पण पाऊस कमी होईपर्यंत आम्ही जागच्या जागी थांबतो. पाऊस आदळतच असतो. त्याचा जोर कमी होण्याचे चिन्ह दिसत नाही म्हणून मग तसेच पुढे घसरायला लागतो. हळूहळू नदीजवळ येतो. या लहानशा नदीच्या बाजूचे कातळ शेवाळलेले असतात. त्यावरनं सर्कस करीत पलीकडे पोचतो. तिथून वर गारजाईला जाणारी पाऊलवाट शोधतो. पण उताराच्या पायवाटेइतकीच चढणीची पायवाट फसवी होते. आम्ही थोडी हाकसाद घालतो आणि एक शेतकरी झुडुपातून उगवतो. गारजाईला जायला पायवाट तिथे नसतेच. तो नसलेल्या पाऊलवाटेबद्दलचे मार्गदर्शन करतो. म्हणजे झाडांच्या शेंड्यांच्या खुणावरून असे असे जा म्हणतो.

दिवसभर आतापर्यंत ११–१२ मैलांची रपेट झालेली असते. शिवाय जवळ जवळ २००० फुटांची चढण चढलेली असते. त्यामुळे थकावट आलेली असते. पाय दुखत असतात. थोडेसे चालल्यावर दम लागतो. पण तसेच रेटतो आणि ती ५।७ शे फुटांची चढण पार करतो. वर पोचल्यावर इतका वेळ दडून बसलेली गारजाईची वाट सापडते. ती डोंगराच्या कडेकडेने गुरांनी केलेल्या चिखलातून जात असते. आता गारजाई आली ही भावना प्रबळ होते. पण हा दिलासा क्षणजीवी ठरतो. वाकड्या गतीने डोंगराला चिकटलेली ती वाट संपता संपता शेवटी ५ वाजण्याच्या सुमारास थकलें भागलेले आम्ही पाच जण कसेबसे गारजाईला पोचतो.

पाटील किंवा मास्तर कुठे राहतात याची चौकशी करतो. पाटील दुसऱ्या घोल गावी राहात असतात. आम्ही इतके थकलेले आणि भुकेलेलो असतो की कुठेतरी ताबडतोब बूड टेकण्यावाचून गत्यंतर नसते. समोरच्याच घरी बैठक जमवतो आणि चहा मिळेल का म्हणून याचना करतो. घरातली बाई आमची अगतिकता जाणते आणि स्वागत करते. तिला दुजोरा देत घरधनी बाहेर ओटीवर येतो.

ओलेत्यानेच बैठक जमते. पाठीवरची ओली ओझी बाजूला सरतात आणि खाद्यपदार्थ हॅवरसॅक्समधून धुंडून निघतात. ओटीवरच्या मुलांना खाऊ दिला जातो आणि हावऱ्यासारखे बकाणे भरून खाणे सुरू होते. भूक भागते आणि आलेल्या चहाने तहानही हरपते. काहीवेळ घेतलेली विश्रांती आणि भरपेट खाणेपिणे, आमचा

मूड बदलवून टाकतात. इथेच रात्रीचा तळ ठोकावा ही उर्मी आता थंडावते. आज सांदोशीलाच मुक्काम करायचा ही पूर्वीची योजना बरोबर असल्याची भाषा आम्ही परत बोलू लागतो. पुढील रस्त्याची चौकशी सुरू होते आणि ५॥ ला परत पाय मार्गस्थ होतात. बोरवाडीच्या वाटाड्याप्रमाणेच हा घरधनी मोठा भला माणूस तो आम्हाला वाटेला सुरक्षितपणे लावल्याचे पाहूनच परत वळतो.

पाऊस थांबलेला असतो. पण त्याची चिन्हे मोडलेली नसतात. दिवस बराच बाकी असूनही अंधारून येते. कावळाखिड उतरायला अर्धा एक तास लागणार असतो आणि नंतर थोड्याच अंतरावर सांदोशी असते. तिथे संध्याकाळी ७॥ ते ८ पर्यंत पोहोचण्याची निश्चिती असते.

कावळाखिड ही १००० फुटांची उभी खिड असते. अधेमधे थोडी सपाटी मिळेल ही आशा इथे नसते. चित्ते आणि श्वापदे अधूनमधून या खिडीत हजेरी लावून जातात असे माहीत असते. त्यामुळे वाघाच्या डोळ्यानी पण हरणाच्या काळजाने वाट तुडवली जात असते.

सायंकाळचा समय. ढगाळलेले आकाश. घनदाट झाडीने झाकलेली कावळाखिड अधिकच अंधारते. थोड्याच वेळापूर्वी पडलेल्या पावसाने पायऱ्यांचे हालते दगड-धोंडे जास्तच निसरडे बनतात आणि दिवसभर पुरी दमछाक झालेले पायांचे स्नायू ब्रेक लावण्याचे काम मोठ्या मुष्किलीने करीत असतात. शरीराबरोबर पाठीवरच्या भिजलेल्या हॅवरसॅक्स जड बनतात.

खिड संपता संपत नाही. विश्रांती घेण्याजोगी जागाही सापडत नाही. वेळ वाट पाहात नाही. चालणे थांबविता येत नाही. ठिकठिकाणी कौतुक करण्याजोगी वनराई आढळते. शेजारचा कोकणदिव्याचा ताशीव डोंगर प्रेक्षणीय असतो. पण या सर्व परिसराचे थांबून रसग्रहण करण्याइतका वेळ हाती नसतो. अति श्रमामुळे मनस्थितीही तितकी उल्हसित राहत नाही. या दमलेल्या अवस्थेत घाईगर्दीने ही भव्य खिड अशा सायंकाळी आपण उतरायला नको होती हे आम्ही स्वतःशी आणि इतरांशीही बोलत असतो. आणि या वनश्रीचे पुरेसे कोडकौतुक आपण करू शकत नसल्याची रुखरुख प्रत्येकाला लागून राहते.

खिड बरीचशी उतरल्यावर पाऊस जोर करतो. अंधार दाटत राहतो. पाण्याचे ओहोळ फुगुन वेगाने वाहत असतात. त्यातून चालणे अवघड होत असते. पण सांदोशीला पुरा काळोख पडण्यापूर्वी पोचण्याची आम्हाला घाई झालेली असते. प्रत्येकजण आपला वेग वाढवतो आणि अधीरतेने, झपाट्याने सांदोशीकडे चालत राहतो. आपण सांदोशीलाच पोहोचू याचा भरवसा नसतो. कारण कावळाखिडीतून दोन वाटा फुटतात— एक कावळ्याकडे व दुसरी डावीकडली सांदोशीकडे. आम्ही उजवे सर्व फाटे सोडतो नी डावीकडे सतत चालत राहतो.

काळोख अधिक काळपटतो. खोऱ्यात कुठेही खेड्यातले दिवे दिसत नाहीत.

रशियन राज्यक्रांतिविषयी प्रचारात्मक साहित्य विपुल आहे. उजेडात आलेल्या नवीन माहितीच्या आधारे लिहिलेला मराठीतील हा मात्र एकमेव ग्रंथ आहे.

# व्होल्गा जेव्हा लाल होते

वि. स. वाळिंबे

अठरा रुपये

राजहंस प्रकाशन

पुणे

समोर रायगड सर्व आकाश व्यापून टाकतो आणि आम्ही अधिक अधीर बनतो.

मात्र पायवाट आता शेतांचा मार्ग धरते. गाव जवळ आल्याची चिन्हे दिसू लागतात. पायवाट रुंदावते आणि तिचे गाडीरस्त्यात रूपांतर होते. हळूहळू अंधार डोळ्यापर्यंत पोचतो. पाऊस रिपरिपत राहतो. विजेऱ्या बाहेर काढण्याच्या ऊर्मीला आम्ही वेसण घालतो. भराभर चालत राहतो. इतक्यात शेणाचा भपकारा नाकात शिरतो. जवळच शेणकई असावीसे वाटते. गाव अगदी नजीक आल्याचे जाणवते आणि थोड्याच वेळात सांदोशीत आम्ही पाऊल घालतो.

पावसाच्या पाण्याने निथळत आम्ही सांदोशीला एका अतिथ्यशील गृहस्थाच्या घरी पोचतो. आमचे स्वागत होते. शाळेत रात्री झोपू हे आमचे म्हणणे ऐकले जात नाही. शक्य तितकी सर्व सोय होईल. इथेच झोपा हा आग्रह परत परत होतो. घरमालक बाहेर गेल्याचे कळते. आम्ही तात्पुरते तरी तिथे थांबण्याचे ठरवितो. ओले कपडे काढतो. आणि सुके अंगावर चढण्यापूर्वी घरमालक घरातून प्रकटतात. आम्हाला हवे नको ते विचारतात. 'तुमचे काहीही धोरण असो, कोणताही बेत असो, तुम्ही कोणीही असा, इथेच रहा' चे पालुपद घरमालक घोकत राहतात. त्यांच्या बोबड्या नी बेताल बोलण्यावरून त्यांनी 'दसरा' साजरा केल्याचे कळून चुकते. आम्ही गप्पा-गोष्टी करीत कपडे बदलतो. थोड्याच वेळात गरम गरम, पक्वान्नयुक्त जेवण आग्रहपूर्वक वाढले जाते आणि आमचा श्रमपरिहार होतो. अशा भ्रमंतीत न मिळणाऱ्या गाद्या झोपायला मिळतात.

गृहस्थ मोठा गोष्टी वेल्हाळ दिसतो. वाघाच्या, भुतांच्या, स्वतःच्या मर्दुमकीच्या गोष्टी रंगात येऊन सांगतो. आम्ही त्या पेंगत ऐकतो. गप्पागोष्टीतून आम्ही कोण, कुठले आणि कुठे व का जाणार हे तो खोदून खोदून विचारतो आणि शेवटी आम्ही खरेच 'गुरूजी' असल्याची खात्री पटल्यावर त्या सर्वांचा झालेला गैरसमज उघड-पणे सांगून टाकतो. आम्ही सी. आय्. डी. ची माणसे असल्याचे समजून घरातल्या माणसानी त्याला लपवलेले असते. पण तो लपून बसायला तयार नसतो. काहीवेळ वाट पाहून तो आपणहून बाहेर पडतो. आम्ही दुसऱ्या दिवशी मांगरुण खोऱ्यातून पायी प्रवास करणार असल्याचे ऐकून तो आम्हाला आमच्या बेतापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करतो. तिथून पाऊल वाटेने बिरवाडी २८ मैल असल्याचे सांगतो आणि ते अंतर कमी भरल्यास 'आमच्या ढेंगाखालून जाण्याची' तयारीही दाख-वतो. सांदोशीहून पाचाडच्या बसने महाडला जाण्याचा उपदेश आणि आग्रह करतो. आम्ही तो मानीत नाही म्हणून सात्त्विक संतापाने उद्‌गारतो, "जा मरा खुशाल तंगड्या तोडीत रस्ता कापा."

□ □ □

२७ जानेवारी माणूसच्या अंकात 'पर्ल हार्बर' ही 'डे ऑफ इनफेमी' या ॲलन लॉर्ड यांच्या कथेवर आधारित कुबेर-कथा संपली. छानच रंगली होती. अखेरचा यामामोटोच्या मृत्यूचा उल्लेख चुकीचा वाटला. 'बोगतवेलींच्या दाट जंगलात मोटारीने प्रवास करताना' यामामोटो मारला गेला नाही. हवाई लढाईतच मारला गेला. संदर्भासाठी ही संपूर्ण कथा पाठवीत आहे. . . .

---

पंढरीनाथ



एप्रिल १९४३ मधला एक दिवस! अमेरिकन नेव्हल इंटलिजन्स विभागाच्या १२४६ नं. खोलीत संकेत लिपि भेद खात्यात जपानच्या नाविक दलाचा एक संदेश पकडला गेला. त्यांनी त्याचा भेद केला. लगेच तो संदेश 'व्हाइट हाऊस'कडे रवाना झाला. प्रेसिडेंट रूझवेल्टने तो वाचला आणि तो कडाडला–

## गेट् यामामोटो!

कारण त्या संदेशात जपानच्या ॲडमिरल यामामोटोच्या सॉलोमन द्वीप समूहाच्या दौऱ्याचा संपूर्ण तपशील होता. या द्वीपसमूहावरील महत्त्वाच्या आरमारी आणि हवाई तळांची तो पहाणी करणार होता. तो कुठून, केव्हा, कुठे निघणार वगैरेचे अगदी मिनिटवार वेळापत्रकच हाती पडले होते. रूझवेल्टच्या त्या दोनच शब्दांनी अमेरिकेच्या आरमारी यंत्रणेची चक्रे गरगरू लागली.

लगेच ॲडमिरल निमित्झकडे खास दूत रवाना झाला. निमित्झ अमेरिकेच्या पॅसिफिकमधील आरमाराचा प्रमुख. त्याचे ठाणे पर्ल हार्बर येथे होते. त्याने दक्षिण पॅसिफिक विभागाचा आरमार प्रमुख ॲडमिरल हाल्से याला त्याच्या नौमिआ येथील ठाण्यावर सांगावा धाडला. ॲडमिरल हाल्सेने ग्वाडालकॅनाल येथील अमेरिकन आरमारी–हवाई ठाण्याचा जिम्मेदार ॲडमिरल मार्क मिट्शर याच्यावर ही जबाबदारी सोपवली. ग्वाडालकॅनालच्या हेंडरसन एअरफील्डपासून सॉलोमन बेटांची साखळी त्यातल्या त्यात जवळ होती. प्रत्येकाची प्रतिक्रिया मात्र रूझवेल्टच्या त्याच उकळत्या शब्दात उसळत होती–

## गेट् यामामोटो! गेट् यामामोटो!

पर्ल हार्बरच्या सैतानाला खतम् केलाच पाहिजे! पर्ल हार्बरच्या नामुष्कीचा बदला यामामोटोच्या खातम्यानेच पुरा करण्याचा निश्चय झाला. यामामोटोच्या या हवाई दौऱ्याचा तपशील असा :–१८ एप्रिलला सकाळी तो राबाऊल येथून निघणार होता आणि त्या भागातल्या सर्वात महत्त्वाच्या काहिली आरमारी हवाई ठाण्याची तपासणी करणार होता. हा काहिली तळ बोगनविले बेटांच्या अगदी दक्षिण टोकाला होता. मात्र तो थेट काहिलीला जाऊन उतरणार नव्हता. बोगनविले बेटांच्या पुंजक्यातील बालाले या बेटुकल्यावर उतरून मग एका 'सब–चेजर' बोटीने काहिलीला जाणार होता. बालाले येथे उतरण्याची त्याची वेळ होती सकाळी ९–४५ ची. यामामोटो मोठा वक्तशीर माणूस होता. मिनिटांचा फरक त्याला वर्षांचा वाटे.

## तेच शेवटी जिवावर बेतले!

त्याच्या या वक्तशीरपणावरच ॲडमिरल मार्क मिट्शरने यामामोटोला खतम करण्याचा बेत बेतला! मिट्शरला आणखी बरीच माहिती मिळाली होती. यामामोटोच्या सोबत नौदलाचे सगळे बडेबडे अधिकारीही जाणार होते. त्यांचे हे उड्डाण दोन नव्या करकरीत डबल इंजिनवाल्या 'मित्सुबिशी' बॉम्बर्समधून व्हायचे होते. अमेरिकन वैमानिक या मित्सुबिशीजना 'बेटीज' म्हणत. त्यांच्या राखणीला सहा

नवी कोरी ' झीरो ' फायटर्स ठेवण्यात आली होती.

## जपान्यांना धोका उमजला नाही

हा दौरा आखताना जपान्यांनी हेंडरसन हवाई तळाचा धोका माहीत असून खिजगणतीत धरला नव्हता. त्यांनी निराळाच हिशेब केला. पहिली गोष्ट : हा हवाई दौरा ज्या बेटांमधून होणार होता तो सगळा टापू जपानच्या संपूर्णपणे कबजात होता. दुसरी गोष्ट : ग्वाडालकॅनॉलपासून हे अंतर जाऊन येऊन काहीच नाही तरी ३०० मैलांचे–जास्तच–होते. एवढ्या पल्ल्याचा हवाई हल्ला करतील अशी अमेरिकेशी फक्त एकाच जातीची विमाने होती.

## लॉकहीड लाइट्निंग ऊर्फ P–38

आणि हेंडरसन तळावर तर त्यातली विमाने केवळ हाताच्या बोटावर मोजता येतील एवढीच होती. काहिली त्यांच्या पल्ल्यात होते पण तिथे शेकडो झीरो फायटर्स त्यांचा फडशा पाडायला सज्ज होती. अशा परिस्थितीत अमेरिकन्स P–38 चा वापर करण्याचा धोका पत्करतील असे जपानी नौदलाने गृहीतच धरले नाही. पण ॲडमिरल मिट्शरने नेमकी हीच विमाने पणाला लावायचे ठरविले.

कारण त्याशिवाय दुसरा पर्यायच नव्हता. वेग, अंतर, पल्ला आणि चपळाई या सर्वच दृष्टींनी पहाता P–38 हे एकच प्रचलित फायटर या कामी योग्य ठरत होते. शिकार बडी होती. सगळ्या नौदल प्रमुखांच्या डोक्यात दोन शब्द सारखे घुमत होते.

## गेट यामामोटो ! गेट यामामोटो !

ही लाइट्निंग विमाने मोठी जबरदस्त होती. त्यांचे संरक्षक कवच (Armour) खास मजबुतीचे होते. दोन एंजिने आणि दोन शेपट्यावाली ही झंझावाती विमाने वापरायला वैमानिकही तसेच कसलेले, थंड माथ्याचे हवे होते. प्रत्यक्ष हल्ला करण्यासाठी सहा विमानांचा ताफा (Trigger Section) आणि त्या रक्षणासाठी बारा विमानांचा दुसरा ताफा ! ट्रिगर सेक्शनसाठी नेता निवडण्यात आला तोही भलता जबरदस्त ! अस्मानी लढाई त्याच्या घराण्यातच होती. कॅप्टन थॉमस जी. लॅम्फियरचा बापही नामांकित फायटर पायलट होता. खुद्द थॉमस अवघ्या १४ व्या वर्षी ' सोलो 'च्या कसोटीला उतरला होता. १९४३ सालापर्यंत त्याने डिस्टिंग्विश्ड फ्लाइंग क्रॉस, एअर मेडल आणि सिल्व्हर स्टार इ. सन्मान मिळवले होते. त्याने आजवर सहा झीरो फायटर्सचा हवेत आणि सहांचा त्यांच्या तळावरच खातमा केला होता. डाइव्ह बॉम्बिंग करून एक जपानी जहाज बुडवले होते. त्याचा हल्ला इतका बिनचूक असे की; एकदा तर त्याने जपान्यांच्या एका ' मशिनगन नेस्ट ' वरच अचूक बाँब टाकले नि ते उध्वस्त केले. कोणत्याही कामगिरीला तो सदैव तयार असायचा. केवळ त्याच्या शब्दाखातर पहिली योजना बाद केली गेली. त्याच्या ट्रिगर सेक्शनने बालाले येथेच यामामोटोच्या सबचेजरवर हल्ला करून

तिच्या ठिकऱ्या उडवायच्या होत्या. मेजर डब्ल्यू मिचेल १२ विमानांनिशी त्याची राखण करणार होता. लॅम्फियरचे म्हणणे पडले, "एक तर आपल्याला सबचेजर इतर बोटींपासून ओळखता येणार नाही आणि त्यातून हल्ला नीट जमलाच तरीही यामामोटो जिवंत सुटण्याची शक्यता टाळता येत नाही. त्यापेक्षा त्याला हवेतच उडवायचे पहा ! झाले !"

## दुसरी योजना ठरली

या योजनेचा सारा भर होता अचूक वेळ साधण्यावर आणि गुप्ततेवर ! क्षण-मात्र उशीर झाला असता तर पक्षी निसटला असता. जरा लवकर जावे तर काहिली तळावरच्या शेकडो झीरोंनी त्यांचा आधीच फडशा पाडला असता अशी संधी आली नसती.

त्यासाठी या विमानांना ४३० मैलं अंतर काटावे लागणार होते. मुंडा, रेन्दोवा वगैरे ठिकाणी असलेल्या जपानी रडार्सनी त्यांना 'पाहू' नये म्हणून जवळजवळ सव्वाशे मैलांचा जादा हिसका घ्यावा लागणार होता. त्याखेरीज टेहळच्या जपानी विमानांनी हेरू नये म्हणून समुद्राच्या पृष्ठभागापासून अवघ्या ५० फुटावरूनच उड्डाण करावे लागणार होते. प्रत्यक्ष हल्ल्याच्या क्षणापर्यंत बिनतारी दळणवळण अजिबात बंद !

लक्ष्य दिसताच लॅम्फियरच्या ट्रिगर सेक्शननें १०,००० फूट उंची गाठून हल्ला करण्यासाठी सूर मारायचा. मिचेलच्या कव्हर सेक्शनने २०,००० फूट गाठून सर-क्षणाची पाखर धरायची.

## प्रथमग्रासे मक्षिकापात !

१८ एप्रिल १९४३ चा रविवार उजाडला तो ढगाळ आकाश नि धूसर धुकट वातावरण घेऊनच ! सकाळी ठीक ७-२५ ला १८ P-38 हेंडरसन तळावर फणफण करीत सज्ज झाली. अॅडमिरल मार्क मिट्शर दूर एका जीपमध्ये बसून पहात होता. त्याचे डोळे कमालीचे कठोर दिसत होते. जबडा गच्च मिटला होता. कपाळावरच्या शिरा टारारून आल्या होत्या. त्याचा ताजा हुकूम होता, "वाटेल ते करा पण त्याला खलास करा ! Get him at any cost !"

भराभर एकेक विमान 'टेक ऑफ्' घेऊ लागले.

एकाचा टायर फुटला नि ते धावपट्टीवरून खाली गेले !

दुसऱ्याला इंधनाची बीमारी झाली !

दोन्ही ट्रिगर सेक्शनची ! म्हणजे त्यातली चारच राहिली.

पण आता थांबतो कोण ?

बरोब्बर ७-३० ला १६ लॉकहीड लाइट्निंग्ज प्रचंड घरघराट करीत निघाली. दोन तास समुद्राला समांतर प्रवास करीत त्यांनी बोगनविले बेटे जवळ केली. काहिली अवघ्या ३५ मैलावर होते आणि अद्याप शिकारीचा पत्ता नव्हता. क्षणभर

कुशंकेचे साम्राज्य आले. आपला वेळेचा अंदाज चुकला की शत्रूचा बेत फिरला ?

## आणि...आणि...आणि

अगदी समोरच लॅम्फियरला दोन काळे ठिपके दिसले. तीच ती मित्सुबिशी ! समोरच ५ मैल अंतरावर आणि २००० फूट उंचीवर होती. पाठीवर ६ झीरो फायटर्स !

आता उशीराला वाव नव्हता ! त्याने वायरलेसवरून सर्वांना त्यांची जागा सांगितली आणि उजव्या वळणाने थेट १०,००० फूट उंची गाठली. मिचेलची तुकडी त्याच्या माथ्यावर निघून गेली. पुरेशी उंची गाठताच लॅम्फियरने शिकारीकडे मोर्चा वळवला ! त्याचे सारे लक्ष पहिल्या 'बेटी'वर केंद्रित झाले होते. कारण बाकीची विमाने त्याचीच राखण करीत असल्याचा पडताळा त्यांच्या 'फॉर्मेशन'वरून येत होता. आता तो त्यांच्या उजवीकडे दोन मैलावर होता. अगदी मोक्याच्या जागी. !

## झडप घालायच्या पवित्र्यात !

तेवढ्यात पहिल्या 'बेटी'ने त्याला पाहिले असावे. त्याने आपले पंख नाचवीत डावीकडे सूर मारला. त्याच्या मागोमाग लॅम्फियरनेही सूर मारला. तीन झीरो त्याच्या नि त्याच्या सावजाच्या मध्ये घुसण्याच्या प्रयत्नात होती. त्यांना दणका देण्यावाचून गत्यंतरच नव्हते. समोर आलेल्या एका झीरोचा पंख छिन्नविच्छिन्न करून तो तसाच पुढे सरकला.

ते आगीच्या ज्वाळांनी होरपळत समुद्रात कोसळले.

पण तेवढ्यात शिकार नजरेआड झाली नि उरलेली दोन झीरोज पाठीमागून अंगावर येऊ लागली. त्यांची ती धडपड पाहून तर लॅम्फियरची खात्रीच झाली की यामामोटो आहे तो याच 'बेटी'त.

त्याच क्षणी त्याचे लक्ष खाली झाडीकडे गेले.

यामामोटोचे बेटी अगदी झाडांच्या शेंड्यांना घासून चालले होते. तो आता लॅम्फियरच्या समोरून आडव्या रेषेत उजवीकडे चालला होता. पाठीवरच्या झीरोंची पर्वा न करता लॅम्फियरने त्याच्यावर झडप घातली.

## यामामोटोची अखेर आली !

झडप घालताना लॅम्फियरला वेग थोडा कमी करावा लागला. एखादे वेळेस त्याच्या डोक्यावरून पुढे जाण्याचा संभव होता. तो टाळण्यासाठी वेग तोडणे हाच एक उपाय होता. मागच्या झीरोंकडे दुर्लक्ष करण्यावाचून गत्यंतर नव्हते.

जीवन मरणाचा खेळ सुरू झाला !

तो तरी किंवा मी तरी !

लॅम्फियरने नेम धरला आणि छोट्या छोट्या फैरी झाडायला सुरुवात केली. तेवढ्यात मागची दोन झीरोज डोक्यावरून पुढे निघून गेली. त्यांच्या फैरी चालूच

होत्या. अंतर इतके कमी झाले होते की कोणत्याही क्षणी बेटीवर जाऊन आदळण्याचा संभव होता. पण तो तयार होता. कोणत्या क्षणी खालून झाडाचा फटका बसेल आणि ठिकऱ्या उडतील याचा नेम नव्हता. लॅम्फियरला त्याची पर्वा नव्हती. त्याने फेरीवर फेरी चालू ठेवल्या. मग एकाएकी 'बेटी'चे उजवे इंजिन पेटले. पाठोपाठ सबंध उजवा पंख पेटला. क्षणार्धात तो पंख तुटून पडला आणि ते विमान एखाद्या शिलाखंडासारखे जंगलात कोसळले.

कडाऽऽड् स्फोट झाला! आगीच्या ज्वाळा उसळल्या!

यामामोटो खतम् झाला!

दरम्यान रेक्स बार्बर या त्याच्या सहकाऱ्याने दुसऱ्या 'बेटी'चा निकाल लावलाच होता. आता लॅम्फियर जमिनीपासून अवघ्या दहा फुटावर होता. जीवाच्या आकांताने त्याने उडी घेतली.

१६ पैकी १५ लाइटनिंग्ज हेंडरसन तळावर सुखरूप परतली.

एकटा ॲडमिरल उगाकी सोडून जपानची बाकी सारी 'नेव्हल कमांड' भस्मसात झाली. उगाकी जळक्या भाजक्या अवस्थेत वाचला पण पुढे जपानच्या शरणागतीची बातमी ऐकून त्याने आपल्या विमानासकट समुद्राच्या पोटात बुडी मारली नि आत्मनाश केला.

एक महिन्यानंतरच जपानने यामामोटोच्या मृत्यूची बातमी अधिकृतरीत्या जाहीर केली.

जपानच्या सर्वोत्कृष्ट दर्याई आणि हवाई सेनानीचा अंत हा असा झाला. पर्ल हार्बरच्या नामुष्कीचा काळीमा अमेरिकेने अखेर यामामोटोच्या रक्ताने धुऊन काढला.

पृष्ठ २३ वरून

नगी दिली आणि मोठ्या कुतूहलाने ते ऐकू लागले, तर त्यांच्या आश्चर्याला पारावार उरला नाही. मुलीची बोटं ऑर्गनवर सराईतासारखी पडू लागली. इतकंच नाही तर त्यात तिचं संगीतप्रेम, कलावंताचा अस्सल आत्मा स्वरास्वरातून उमटत होता. पण काहीतरी लक्षात आल्याचा भाव त्यांच्या मुद्रेवर दिसला व ते गप्प झाले...त्यानंतरही अनेक प्रसंग आले, ज्यात मुलीच्या कलागुणांचा प्रत्यय अतिशय प्रकर्षानं येत राहिला...पुढे पुढे तर स्वतःला नकळत ते मुलीचा सल्ला घेऊ लागले. – अगदी अपरिहार्य स्वरूपात ! 'धुंद मधुमती...' या गीताच्या चालीबद्दल मनात सभ्रम असताना मुलीला विचारूनच त्यांनी चाल पक्की केली...हे सारं होत होतं तरी – परत तीच मायेतली हतबलता ! तोच निश्चय ! मुलगी परत संगीताला वंचितच राहिलेली ! पण तिनं विचार करणं, संगीतावर चिंतन करणं सोडलं नव्हतं.. हे सारं असं असूनही पित्याचा सांगीतिक सहवास तिला लाभत गेला होता. पित्याच्या वैचारिक दिशेचा तर तिने सांगोपांग अभ्यास केलेला आणि म्हणूनच त्याचा ठसा तिच्या स्वररचनेवर अपरिहार्य स्वरूपात प्रगटलेला...आणि नव्या काळाच्या संदर्भात आणि स्वतःच्या वैयक्तिक सौंदर्यविचाराच्या संदर्भात परत एक नवा रंग, नवा धागा त्यात मिसळलेला.

– आणि अचानक वीणा चिटको हे नाव श्रीनिवास खळे, हृदयनाथ मंगेशकर, मंगेश पाडगावकर आदींच्या कानावर गेलं – स्वतःहून त्या कधी सांगायला गेल्या नाहीत तरी गेलं...हे सिद्धहस्त कलावंतही चकित झाले. मनस्वी खुलून गेले त्या चाली ऐकून ! हृदयनाथ मंगेशकरांनी तर आपल्या 'भावसरगम'मध्ये त्यांची ती गीतं घेतली. सौ. मधुबाला चावला ती गीतं गात असत. इतकेच नव्हे तर 'मयूराऽ! रेऽ! फुलवित येऽ रेऽ पिसारा...!' हे गीत कार्यक्रमाच्या सुरवातीला सर्वप्रथम गाईलं जाई. इतकं त्यांना हे गीत आवडलं. ते सदैव 'ही गीतं तुम्ही रेकॉर्ड का करीत नाही?' अशी पृच्छा करीत. खळे तर फारच खुष झाले... वीणाताई, मास्तरांच्या कन्या म्हणून तुमची स्तुति करतोय असं समजू नका, पण खरोखरी तुम्ही बांधलेल्या चाली अप्रतिम आहेत' असा त्यांनी खुल्या दिलाने आनंद व्यक्त केला. आणि ही गीतं त्यानंतर रेकॉर्ड करण्याचं ठरलं. दिवस निश्चित केला गेला...कामतांनी जिद्दीने तयारी केली आणि ही आगळ्या ढंगांची, मास्तरांची लकब व्यक्त होत असतानाच स्वतःचं वेगळेपण ठसवीत जाणारी, शास्त्रीयता आणि लालित्य या दोहोंचा एकाचवेळी प्रत्यय घडवणारी ही गीतं अत्यंत निष्ठेने, मनःपूर्वक गाऊन दाखविली. एच्. एम्. व्ही. च्या स्टुडिओत एकाच दिवशी चार गीतांचं ध्वनिमुद्रण झालं. तेथील तंत्रज्ञांपासून, जाणकारांपासून

सामान्य श्रोत्यांपर्यंत सर्वांच्या मनाला ही गीतं भिडली. समर्थ स्वररचनेचा प्रत्यय साऱ्यांनी अनुभवला; भरघोस यशाची हमी साऱ्यांनी एकमुखाने दिली. स्वत: वीणाताईंनांही मनस्वी समाधान झालं. जीवननाट्याने घेतलेलं हे अकल्पित नवं वळण त्यांच्या सुप्त गुणवत्तेचं दर्शन घडवणारं ठरलं. आणि तुरळक मराठी स्त्री संगीतरचनाकारात नव्याने 'वीणा चिटको' हे नाव गोवलं गेलं.

ह्या गीतांचं वैशिष्टच म्हणजे त्यातील अस्सल ऋजुता! नैसर्गिक सहजता! स्वरांचं व्यक्तिमत्व खऱ्या अर्थाने ओळखणाऱ्या व त्या व्यक्तिमत्वाशी इमान राखणाऱ्या अस्सल कलावंताचं दर्शन ह्या स्वरसंगतीमधून लक्षात येतं. कुठल्याही तऱ्हेचे सांगीतिक पूर्वग्रह येथे नाहीत. सांगीतिक सौंदर्यविचारात हवी ती वस्तुनिष्ठ भूमिका आहे. आणि म्हणूनच कुठल्याही तऱ्हेचा अभिनिवेश नाही. त्यामुळे ह्या स्वररचनेतील सुयोग्य रूप भारून टाकणारं आहे. त्यातलं भावतरल रूप तर खिळवणारं आहे. ह्या सहजसुंदर आविष्कारात कुठेही वैचित्र्याचा, भडकपणाचा मोह नाही. नव्यानेच संगीत दिग्दर्शिका म्हणून लोकांपुढे येताना कुठेही हेतुपूर्वक डोळ्यात भरण्याचा प्रयत्न नाही, वृत्तीत कलात्मक नम्रता आहे. गीतांचं रेकॉर्डिंग होणार त्या दिवशी जवळ बाबा नाहीत. आशीर्वाद हवा. धावतं हे मन लताबाई-कडं पोहोचलं. त्यांच्या पायांशी नतमस्तक झालं. लताबाईंनी तोंड भरून आशीर्वाद दिला. प्रथितयश संगीतकारांबद्दल सदैव नम्र आणि विद्यार्थिनीसारखी शिकाऊ भूमिका पण त्यातही अतिरेकी, व्याज स्वरूप नाही. 'मला सर्वच संगीत दिग्दर्शकात या ना त्या स्वरूपात लक्षणीय असं काही ना काही गवसत आलेलं आहे.' ही गुणग्राही वृत्ती, तसाच 'कितीही मोठा संगीत-दिग्दर्शक असला तरी त्याच्या सर्वच्या सर्वच रचना आवडतात असंही नाही.' हा परखडपणाही आहे.

आपल्या वडिलांबद्दल अतीव श्रद्धा! ...ती व्यक्त होतांना ते माझे फार जवळचे, प्रत्यक्ष वडील म्हणून त्यांच्यावर अधिक श्रद्धा! ...पण कुठे ना कुठे श्रद्धा ही हवीच! निदान संगीतात तरी श्रद्धेशिवाय चालत नाही, तसं पाहायला गेलं तर जिथं चांगलं दिसेल तिथं माझी श्रद्धा जडते... ही भूमिका. संगीत रचनेत स्फूर्तीवर, प्रामाणिकतेवर अधिक भर. त्यामुळे चाल सुचली की ते गीत स्वरबद्ध करायचे अशी अभ्यसपद्धती! केवळ स्वररचना केली गेली पाहिजे म्हणून कृत्रिम, साचेबद स्वरूपात काहीतरी चालू ठेवायचे असे रूप नाही! म्हणूनच त्यात फार मोठ्या महत्त्वाकांक्षा, हाव नाही आणि म्हणूनच यश आणि अपयश यापैकी कुठल्याच गोष्टीचं सुखदु:ख नाही...कलानिर्मिती हा आत्माविष्कार असतो...गीतांना चाली बांधताना मला लाभणारा आनंद दुसऱ्यांनाही अनुभवता आला, त्यांना आनंद वाटला तर मला समाधान लाभतं म्हणून लोकांपर्यंत ही गीतं पोचवायची! असं त्या सांगताना आढळतात.

सायंकालीन रागावर वीणाताईंचं विशेष प्रेम! श्री, गुजरी तोडी, मारवा,

बैरागी भैरव, शिवरंजनी, यमन, पहाडी, सोहोनी हे काही आवडते राग ! सायंकालीन राग अधिक ' feel ' होतात ही मनोधारणा ! म्हणूनच ' सांग प्रिये, सांग प्रिये, घन भरून आले '...हे ' श्री ' रागावर विशेष भर दिलेले गीत उदाहरणादाखल देता येईल. ' सखी सांज उगवली. ' ह्या गीतातील शब्दही सायंकालावरील प्रेमातून आलेले !

आजही हे सारं चाललंय् ते एकीकडे स्वयंपाक, घरातील कामं सांभाळीत, दुसरीकडे मुलांना हवं नको ते बघत. पतीच्या शेअर बाजाराची कामं करण्यातदेखील हातभार लावीत, आल्या-गेल्यांना सांभाळीत !! ...आईच समर्पित जीवन-जे त्यांना वडिलांच्या कलासाधनेतील तपश्चर्येइतकंच मोलाचं वाटतं. तिची शिकवण ह्यानुसार संसार व कला यांचा समन्वय साधायचा ही भूमिका ! आणि विशेष म्हणजे अजूनही वडिलांना आपल्या या रेकॉर्डस्बद्दल, संगीत दिग्दर्शनाबद्दल सांगण्याचं धैर्य या मनाला होत नाहीय्. भिडस्तपणा अजून कायम ! ...' रागावणार तर नाहीत ना ?' अशी धास्ती !

पण बाहेरून जाणकार कलावंतांच्या तोंडून ह्या गोष्टी बाबांच्या कानावर पडतात...हृदयनाथांसारखा एखादा जाणकार कलावंत म्हणतो ' मास्तर, तुमचा वारसा या तुमच्या मुलीत आलाय्...' पाडगावकर म्हणतात ..' ही जन्मजात देणगी घेऊन आलीय्.. आणि इतक्या वर्षांच्या संगीतापासूनच्या दुराव्यानंतरही इतक्या ताजेपणाने, रसरसलेल्या स्वरुपात ही गुणवत्ता प्रगट होतेय्...हे जपलं गेलं पाहिजे...' कामतासारखे कुणी ती गाणीही ऐकवतात ..

...काळ झपाट्याने पुढे निघून गेलेला असतो. त्याच पित्याचं मन ह्या साऱ्यांनी भरून येतं... ' अग तुझी ती चाल, ती हरकत डोक्यातून जात नाही बघ...' असं म्हणत हृया गीतातील ओळी खुद्द पित्याकडूनच मोठ्या संतोषाने गुणगुणून बवितल्या जात राहतात...आणि ते भरल्या डोळ्यांनी बघताना मुलीला जन्माचं सार्थक झाल्यागत आनंद होतो...' आपली चाल बाबा गुणगुणताहेत '...ही अतीव समाधानाची, सार्थकतेची अनुभूती !!

निसर्गनियमाइतक्या सहजपणे हृया दूर्वा रुजून उठलेल्या असतात...नव्या ऋतूच्या, नव्या काळाच्या संदर्भात आपल्याच स्वरांना जणू काही नवं ताजेपण, नवी संदर्भसंपन्नता, नवं चैतन्य प्राप्त झाल्याचा भास पित्याच्या मनाला होत राहतो...

रसिकांच्या कानी जेव्हा ही गीतं पडली तेव्हा तेही हृया नव-प्रतिभेला वीणाताईंच्याच शब्दात म्हणत राहिले.

" मयूरा ऽ ! रे ऽऽ !

फुलवित ये ऽ रे ऽ पिसारा " आणि हृया प्रतिभेच्या नव्या उन्मेषाकडे साऱ्यांचे डोळे लागून राहिले आहेत.

□ □ □

## एक नामवंत क्रीडातज्ञ

# श्री. हरिभाऊ साने

कबड्डी हा मातीशी मस्ती करणारा खेळ असेल जरूर पण त्यालाही काही शास्त्र आहे, तंत्र आहे, मंत्र आहे. खेळाडूला कबड्डी खोखोमध्ये प्राविण्य मिळवण्यासाठी त्यातील कौशल्यस्थाने नेमकी हेरावी लागतात. पहिलवानी धुसमुसळेपणा अथवा अंगदांडगाई आणि पाठशिवणीच्या खेळाची जरा सुधारलेली आवृत्ती ही कबड्डी-खोखोबद्दलची कल्पना आता मागे पडत आहे.

देशी खेळांचा विकास आज अनेक अंगानी होत आहे. वाढ परिपूर्ण होण्यासाठी ते आवश्यकच आहे. कबड्डी-खोखोच्या खेळाची शास्त्रीय बैठक शरिरशास्त्रीय आणि मानसशास्त्रीयही त्याचा अभ्यास, कौशल्याचा विकास करण्यासाठी वापरावयाच्या निरनिराळ्या पद्धती, खेळाडूंना द्यावयाच्या प्रात्यक्षिकाच्या अभिनव योजना, कबड्डीचा खेळ अधिक आक्रमक आणि आकर्षक होण्यासाठी अभ्यासपूर्णतेने आखलेल्या आणि प्रत्यक्षात आणलेल्या योजना या साऱ्यामध्ये पुण्याचा सन्मित्रसंघ आणि त्याचे चालक हरिभाऊ साने हे आघाडीवर आहेत. किंबहुना अशा स्वरूपाचे प्रयत्न जाणीवपूर्वक सातत्याने करणारे ते महाराष्ट्रात एकटेच आहेत.

तसे म्हटले तर सन्मित्रसंघ हरिभाऊंनी १९२३ साली स्वत: शाळेत असताना स्थापन केला. प्रजासमाजवादी पक्षाचे अध्यक्ष नानासाहेब गोरे हे खोखोचे उत्कृष्ट खेळाडू होते आणि त्यांच्याबरोबर सामने खेळल्याची आठवण ते सांगतात. या सुमारे पन्नास वर्षात कबड्डी, खोखोनी आणि इतर खेळांनी अनेक स्थित्यंतरे बघितली. आटयापाटया नामशेष झाला, लंगडी नाममात्र राहिली. हुतूतूचे कबड्डीमध्ये रूपांतरीत झालेल्या खेळाचा चेहरामोहरा पार पालटला. या साऱ्या कायापालटामध्ये चांगले जुने टिकवित, नवे शास्त्र आत्मसात करत आणि अधिक सुधारण्यासाठी धडपडत हरिभाऊंनी आपले ज्ञान नेहमी ताजे ठेवले आणि त्याच्या जोडीला क्रिडां-

गणावरची संध्याकाळची फेरी कधीही न चुकविता ते आचरणात आणले. आणवून घेतले.

'आट्यापाट्या आणि लंगडी याचे शिक्षण मी कबड्डी-खोखोच्या खेळासाठी अत्यावश्यक मानतो. आट्यापाट्यामध्ये तयार होणारे फूटवर्क आणि लंगडीमध्ये द्यावयास लागणाऱ्या झुकांड्या आणि हुली याचा कबड्डी-खोखोत खूपच फायदा होतो. आट्यापाट्याचे सामने सध्या कोठे भरतच नाहीत. पण तरीही चांगला खेळाडू बनायचे असेल तर आट्यापाट्या शिक्षण हवेच. लंगडीचे सामनेही मिरजेसारख्या एखाद्याच ठिकाणी भरतात. अशा ठिकाणी मी आवर्जून माझे खेळाडू पाठवितो. कारण या खेळातून तयार होणाऱ्या पायावरच पुढच्या कबड्डी खोखोच्या यशाची कमान उभी रहाणार असते.'

'याशिवाय त्या त्या खेळाचे शिकवण्याचे असे कोणते आडाखे तुम्ही बांधले आहेत?'

'महिना नु महिने मैदानावर मुले सराव करत आहेत आणि न चुकता तेथे उभा राहून 'कोच' पंचाचे काम करतो आहे, याचा माझ्या मते काहीच उपयोग नाही. त्या सातत्याचे आणि नियमितपणाचे कौतुक जरूर करेन. पण ते खेळाडू तेवढ्या महिन्यात शिकले किती? त्या कोचने त्यांच्या किती चुका हेरल्या आणि त्याला किती नवे ज्ञान दिले असा विचार केला तर निराशाच पदरी येते. दुर्दैवाने बहुसंख्य क्रीडासंस्थात आणि शाळा कॉलेजच्या मैदानावर खेळाचा सराव म्हणजेच उत्कृष्ट मार्गदर्शन असे समजून आंधळे कोचींग चाललेले असते.'

'तुमचे मार्ग कोणते?'

'खेळाचे स्वरूप, त्यातील बारकावे, कौशल्याचे प्रकार हे खेळाडूला नीट समजावून द्यावयास हवेत आणि स्वतंत्र बुद्धीने त्याला त्याचा वापर करता यावयास हवा. वेगवान संघर्षमय, जिद्दीची गरज असलेला आणि शक्तिपेक्षाही युक्ति आणि सफाई यांची आवश्यकता असलेला हा खेळ. ताकद असेल तर दुधात साखर. प ताकदीशिवायही चांगला खेळाडू बनता येते. मात्र तंत्र पक्के हवे. चढाई करताना सुरुवात गडबडीने न करता संथ करावी, वाकून खेळावे, साती खेळाडू नजरेच्या टप्प्यात खेळते ठेवावेत. चढाई मध्यरेषेला काटकोनात असावी. दोन्ही पाय एकाच वेळी जमिनीला टेकून शक्यतो उभे राहू नये, फूटवर्क नेमके असावे या साऱ्या गोष्टी खेळाडूला हाताला धरून शिकवाव्या लागतात. नाहीतर पायाच कच्चा रहातो. कधी कधी नावाजलेले खेळाडूही या चुका करतात आणि सामना हरतात तेव्हा याची गरज अधिकच जाणवते.'

कबड्डीमध्ये मैदानावरचे क्षेत्ररक्षण नेहमी बदलते असते. एकापासून ते सातापर्यंत कितीही खेळाडू एकावेळी त्या परिस्थितीप्रमाणे आत असतात. खेळाडूंची आत असलेली संख्या, त्यांचे क्षेत्ररक्षण याप्रमाणे चढाई करणाऱ्याला त्यांना बाद करण्या-

साठी पवित्रे घ्यावे लागतात. तासभर खेळाडूंनी दमदारपणे कबड्डीचा सराव केला म्हणजे काही 'कोच'चे काम झाले नाही. वरील प्रत्येक परिस्थितीत त्या चढाई-पटूने कसे खेळावे हे तसे खेळाडू मैदानात नेमके ठेवून मार्गदर्शकाने दाखविले पाहिजे. असा अर्धा तासाचा सरावदेखील मग नुसत्या तासभर खेळापेक्षा खूप मोलाचा ठरतो.'

'बचाव करणाऱ्या खेळीचे असे तुम्ही कोणते खास तंत्र शिकवता का?'

'राखीव क्षेत्राचा (लांबी) चटकन आणि कौशल्यपूर्ण उपयोग याचा वापर योग्य त्या पद्धतीने करता आल्यास संघाला त्याचा हमखास फायदा मिळतो, झटापट चालू

---

## तुम्हाला काय वाटते ?

खोखो हा मुळातच वेगवान खेळ आहे. दोन बलाढ्य संघातला सामना येथे हमखास रंगतोच. सरावासाठी आधिक सातत्य त्याला आवश्यक असते. वेगाने पळताना सूर घेऊन गडी बाद करण्यातले कौशल्य नजर खिळवणारे असते. आणि नागमोडी अथवा अंगकृति पळताना सफाईदारपणे दिलेल्या हुलकावण्या नजर सुखावणाऱ्या ठरतात.

पण तरीही मला कबड्डी हा अधिक अवघड, अधिक कौशल्यपूर्ण आणि अधिक आकर्षक खेळ वाटतो. एका गड्याने वा संघाने दुसऱ्या गड्याचा केलेला पाठलाग हे खोखोचे ढोबळ स्वरूप. त्यामध्ये येऊन येऊन किती कौशल्य येणार? या उलट कबड्डीमध्ये बचाव करणारे आणि चढाई करणारे यांची संख्या सारखी बदलत असते. दरवेळा नवीन धडपड नवीन युक्ति शोधावी लागते. समोरच्या खेळाडूच्या मानसशास्त्राचा अभ्यास अधिक अचूकपणे असावा लागतो. कौशल्याचे प्रकारही किती विविध. एक कोपरा-रक्षक घेतला तर त्याला चवडा धरणे, लवण पकडणे, एकेरी, दुहेरी, पट-काढणे, साखळी फिरवणे, ब्लॉक करणे, पाठलाग करणे, पाठ पकडणे, अशी अनेक कौशल्ये आत्मसात करावी लागतात. आणि समोरच्या खेळाडूचे कच्चे दुवे आणि प्रत्यक्ष परिस्थिती याची सांगड घालून त्या कौशल्यांचा वापर करावा लागतो. या शिवाय इतरांच्या मिळणाऱ्या मदतीवर त्याचे यश अवलंबून असल्याने खेळाची अनिश्चितता आणि पकडणाऱ्याची जबाबदारी अधिक वाढते.

एखाद्या भक्कम संघाविरुद्ध खोखोत दोन मिनिटे पळणे आणि कबड्डीमध्ये दोन गुण मिळविणे यामध्ये दुसरे निश्चितच अधिक अवघड आहे. तुम्हाला काय वाटते?'

---

झाली की राखीव क्षेत्रामधून निसटण्याची धडपड बहुतेक सर्व चढाईबहाद्दर करतात. लांबीच्या तीन फुटी जागेत एक खेळाडू जर नेमके आणि पक्के पाय रोवून ती जागा अडवून उभा राहिला तर भल्याभल्या खेळाडूंना तो सहजा रोखू शकतो. कारण अलिकडच्या बाजूस क्षेत्ररक्षण तयार असते. पलिकडच्या बाजूस मैदानाची हद्दच संपलेली असते. माझ्या संघाने हे तंत्र आत्मसात करावे म्हणून मी नेहमीच भर दिला आहे. हाताला हात धरून साखळी पद्धतीने व्यूह रचण्याचा प्रकारही मला नामंजूर आहे. यात मला अनेक तोटे वाटतात. मधल्या खेळाडूचे हात दोन्ही बाजूने पकडलेले, म्हणजे त्याचा उपयोग संघाला शून्य. कोपऱ्याने जवळच्याचा हात धरला तर तो हात सोडून मग पकड घेणे आणि दोन्ही हात सुटे असताना पक्कड घेणे यात अधिक वेळ कशाला लागेल तुम्हीच सांगा ? दोघांनी मिळून साखळीत केलेली पकडही बऱ्याच वेळा कच्ची असते. माझ्या मते याचे मूळ कारण मानसशास्त्रीय आहे. कारण चढाई करणाऱ्या गड्याचा पवित्रा हेरून तो पकडण्याच्या तंत्रात एका विविक्षित गाफील क्षणी आला की पकडणारा त्याला पकड घेतो नेमकी त्यांनी हेरलेली ही वेळ शेजारच्या हाताच्या गड्याला समजेलच असे नाही, आणि मग निर्माण झालेल्या गोंधळात बहुधा दोघेही बाद होतात. त्यापेक्षा माझ्या संघात मी कोपरे सुटे ठेवतो आणि गेल्या मोसमात तीन ठिकाणी अजिंक्यपद आणि दोन उप-विजेतेपद मिळवणाऱ्या माझ्या संघाला त्याचा नेहमीच फायदा झाला आहे. वैद्य या आमच्या कोपरारक्षकाला तर अनेक ठिकाणी उत्कृष्ट कामगिरीची पारितोषिके मिळाली आहेत.'

'खोखोच्या खेळातली कोणती कौशल्ये तुम्ही खेळाडूना अधिक आग्रहाने शिकवता ?'

'खोखोच्या बाबतीत एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे, खोखो आहे दमाचा खेळ. तरुण रक्तालाच तो झेपू शकतो आणि वेळीच निवृत्त झाले नाही तर अनुभवी, जाणत्या खेळाडूंचा तिथे फज्जा उडतो. संघात सातत्याने तरुण रक्त राहील याची मी नेहमी काळजी घेतो. कुणाच्या रागालोभाची पर्वा न करता ७३ साली राष्ट्रीय स्पर्धेत खेळणारा संघ मी आताच जाहीर केला आहे. एखादा अपवाद वगळता जुन्यानी वेळेवर खेळातून निवृत्त व्हावे हे संघाला नेहमीच फायद्याचे ठरते.'

वस्तादाशी लढल्यावरच चेला सुधारतो हे मला दोन्ही खेळाबाबत मान्य आहे. म्हणून मी छोट्या आणि नवोदित खेळाडूंना नेहमीच भारी संघाशी खेळवितो. हेमंत जोगदेव हा उत्कृष्ट खोखोपटू आहे हे सर्वांना पटले, पण तरीही इतक्या कोवळ्या कुमाराला पहिल्याच तिघांच्या तुकडीत पाठवावे हे मुंबईकरांना पटत नाही. त्यांना ती 'जादा' जबाबदारी वाटते. मी मात्र बेडरपणे त्याला ही संधि देतो. यंदा कुमाराचे राष्ट्रीय खोखो स्पर्धेत एकलव्य पारितोषक त्याला मिळाल्याने माझाच हट्ट उपयोगी ठरला असे मला वाटते.

' प्रत्यक्ष खेळाच्याबाबत म्हणाल तर बाहेर खेळणे, चौकात खेळणे, हुलकावण्या देणे चांगल्या खेळाडूला आले पाहिजे हा माझा आग्रह असतो. नुसता पळत राहिला तर पाठलागाचा वेग वाढतो आणि खेळाडू फुकट लवकर मरतो. या उलट बाहेरून झुकांड्या देत खेळले तर वेगाला खंड पडतो. खुंटावर जाऊन खेळणे याला चांगले खेळाडूही बिचकतात. खुंटावरच्या जागेला खेळाडूचे Death bed समजण्यात येते. माझ्या खेळाडूंच्या मनातून ही भिती काढून टाकण्यासाठी मी त्यांना मुद्दामहून खुंटावर खेळण्याचा सराव देतो. वाकून गडी मारणे, वेग एकदम वाढवणे आणि कमी करणे या गोष्टीसाठी काही खास प्रकारे मी शिक्षण देतो. मला वाटते अवघ्या दोन वर्षात सन्मित्राच्या खोखो संघाचा दबदबा जो एकदम वाढला आणि यंदाच्या महाराष्ट्र राज्याच्या खोखो संघात एका मंडळाचे नऊ खेळाडू असण्याचा जो विक्रम मंडळ करू शकले त्याचा धागा या शास्त्रशुद्ध विचाराच्याकडे आणि त्याप्रमाणे केलेल्या प्रयत्नाकडे जातो.'

' खेळाडूंच्या दृष्टीने आणखी कोणत्या गोष्टी तुम्ही आवश्यक मानता ?'

' सामन्याच्यावेळी खेळाडूंना चांगला योग्य सकस आहार मिळावा यावर माझा कटाक्ष असतो. मी खेळाडूंना मसाज शिकवले आहे. अंग ताजेतवाने होण्यास त्याचा खूपच फायदा होतो. याबरोबरच खेळाडूने संघभावनेने खेळावे आणि संपूर्णपणे

---

## हलवता येणारे मैदान

सन्मित्र मंडळ सध्या तयार करत असलेले कबड्डीचे Portable क्रीडांगण हा सध्या कबड्डीशौकीनात एक खास चर्चेचा विषय आहे. खेळताना खेळाडूला होणाऱ्या दुखापती या बऱ्याच वेळा मैदान चांगले नसल्याने होतात. मैदानाची बरीवाईट स्थिती अनेक सामन्यात निर्णायक ठरते. पावसाळचाचे चार महिने अतिशय छोटचा जागेत खेळता येणारा हा खेळ मोठे हॉल असूनही बंदच ठेवावा लागतो. या साऱ्यावर एका जागेहून दुसऱ्या जागेवर हलवता येणारे हे मैदान तोडगा ठरू शकेल. वर्ष दोन वर्षाच्या प्रयत्नानंतर सुमारे अडीच हजार रुपये खर्च करून हे मैदान आता पूर्णावस्थेला पोचत आहे. पॅकींगचे रबर आणि इतर काही गोष्टी यापासून हे तयार केले जाईल. अर्थातच प्रत्यक्ष सामने खेळल्यावर त्याचा टिकावूपणा आणि उपयुक्तता याबद्दल अधिक नेमके बोलता येईल. अशा प्रयत्नांची गरज लक्षात घेऊन त्यासाठी जाणीवपूर्वक धडपड करणारे हरिभाऊ आणि त्यांची संस्था व ही गरज मान्य करून त्यांना योग्य ती आर्थिक मदत लगेच देणारे महाराष्ट्र खात्याचे क्रीडासंचालक श्री. वाखारकर हे निश्चितच प्रशंसेस पात्र आहेत.

---

शिस्तीनेच खेळावे याबद्दलचा माझा आग्रह कडक असतो. मात्र गुणानुक्रमाने म्हणाल तर उत्कृष्ट अभ्यास, चांगली वागणूक आणि मग कौशल्य अशी मांडणी मी करेन.'

'नेतृत्वाच्याबद्दल तुमच्या काही विशेष अपेक्षा ?'

'संघनायक खेळाच्या तंत्रात तज्ञ असावाच पण कोणत्या वेळी काय करावे याची अचूक जाणीवही त्याला हवी. याबरोबरच खेळाडूंच्या चुका त्याला नाराज न करता समजावून सांगून त्याला प्रोत्साहनही कर्णधाराला देता आले पाहिजे. हा समजूतदारपणा फारच थोडे संघनायक दाखवितात.'

'कबड्डीच्या शास्त्रशुद्ध वाढीकडे आणि त्याचबरोबर प्रसारामध्ये तुमची भूमिका काय ?'

'शास्त्रशुद्ध वाढीमध्ये अनेक उपक्रम तर आमच्या मंडळानेच चालू केले. खेळाचे नियम आणि वेगवेगळ्या परिस्थितीची कल्पना देणारे नकाशे आम्ही तयार केले. चर्चेत त्याचा खूप उपयोग होतो. कबड्डी आणि खोखोचा खेळ कसा शिकवावा, याचा आसनांचा असतो तसा नकाशाही आम्ही करत आहोत. प्रत्येक शाळा-कॉलेजला ते आवर्जून घ्यावे लागतील इतके ते उपयुक्त ठरतील. खेळाडूंना आणि 'कोचना' सर्वांगीण शिक्षण देण्याचे शिबिरही आम्ही आयोजित केले होते आणि ते खूपच फलदायी ठरले. बचावात्मक कबड्डीमुळे निर्माण झालेली कोंडी फोडण्यासाठी आयोजित केलेले सामने, अथवा सर्व नवोदितांना संधी मिळावी म्हणून महानगरपालिकेच्या प्रत्येक वॉर्डाचा संघ करून मेमध्ये घेण्यात येणारे सामने, किंवा कबड्डीचे कोठेही हलवता येणारे मैदान हे आमचे आणखी काही उपक्रम. कबड्डीच्या प्रसाराबद्दल म्हणाल तर संघावर, जिल्ह्यावर, कोरड्या नियमावर प्रेम करणारे लोक मूळ कबड्डीच्याबद्दलचीच माया कमी करत असतात असा कडू अनुभव काही वेळा येतो खरा.'

'मग तुमचे जास्त प्रेम कशावर ?' मी उठताना हसत हसत प्रश्न विचारला. मात्र तोच माझ्या विचाराला चालना देणारा ठरला.

'तसा प्रेमाचा प्रश्न नाही पण खोखो हा निश्चितच अधिक अवघड खेळ आहे. कबड्डी त्यामानाने सोपा खेळ. खोखोमध्ये अधिक अवधाने अधिक कौशल्याने सांभाळावी लागतात. खोखो खेळणारा खेळाडू कबड्डी खेळू शकेल पण उलटे मात्र शक्य होईलच असे नाही. तुम्हाला काय वाटते ?'

□ □ □

## कॉलेज विश्व पुण्या-मुंबई बाहेरचे

# कथाकथन स्पर्धा १९७१

महाराष्ट्रातील महाविद्यालयातून वक्तृत्व, संगीत यांच्यासाठी आंतर महाविद्यालयीन स्पर्धा घेतल्या जातात व त्यासाठी ढाली किंवा करंडक ठेवलेले असतात. नगरच्या सारडा कॉलेजचा उपक्रम वेगळा आहे. वक्तृत्व नाटयगीत, काव्यवाचन व कथाकथन याप्रमाणे दरवर्षी शारदा करंडक यापैकी एकासाठी ठेवला जातो. यंदा ९-१० जानेवारी १९७१ रोजी या करंडकासाठी कथाकथन स्पर्धाचे आयोजन आंतरमहाविद्यालयीन पातळीवर करण्यात आले.

पुण्यापासून परभणीपर्यंतच्या महाविद्यालयांना संघ पाठविण्याबद्दल विनंतीवजा परिपत्रके गेली. अपेक्षेइतका प्रतिसाद मिळाला नाही तरी एकंदर बारा कॉलेजांचे संघ स्पर्धेत उतरले होते. २४ विद्यार्थी-विद्यार्थिनींनी उत्साहाने यात भाग घेतला होता. स्पर्धेच्या दिवशी म्हणजे शनिवारी ९ जानेवारीला नगरच्या सारडा कॉलेजचा परिसर सळसळत्या तारुण्याच्या चैतन्याने रसरसून गेला होता. परीक्षक म्हणून पण मोठ्या उत्साहाने पुण्याहून श्री. श्री. ज. जोशी व श्री. बाळ गाडगीळ हे लेखकद्वय आले होते.

दोन दिवस चाललेल्या या स्पर्धेतून खूप गमतीशीर निष्कर्ष पहायला मिळाले.

पुण्याच्या स. प. महाविद्यालयाने हा शारदा करंडक जिंकला. त्या महाविद्यालयाच्या कु. शोभना लघाटेने महादेवशास्त्री जोशींची 'घररिघी' ही गोष्ट सांगून ५० रु. चे पहिले बक्षीस पटकावले. त्याच कॉलेजच्या राजेंद्र पाटणकर यांनी व. पु. काळे यांची एक गंभीर कथा सांगून उपस्थितांच्या डोळ्यातून पाणी काढले. या दोन्ही विद्यार्थ्यांनी निवडलेल्या कथा गंभीर होत्या. कॉलेजच्या श्रोत्यांपुढे त्या सांगणे म्हणजे कथाकथन करणाऱ्याला एक प्रकारचे आव्हान देणाऱ्या होत्या. पण कमालीच्या तन्मयतेने कु. लघाटे व

श्री. पाटणकर यांनी आपल्या कथा सांगितल्या व हा समज खोटा पाडला की कथाकथनासाठी विनोदी गोष्टीच केवळ यशस्वी होऊ शकतात. लघाटेची आवाजातील चढउतार, पाटणकरांची श्रोत्यांना विश्वासात घेणारी मनमोकळी, अकृत्रिम शैली वाखाणण्याजोगी होती.

३० रु. चे दुसरे पारितोषिक चाळीसगावच्या प्रकाश भंडारे यांनी पटकावले तर २० रुपयांचे तिसरे बक्षीस श्रीरामपूरच्या श्री. हलडले यांनी मिळवले भंडारे यांनी द. मा. मिरासदारांची 'व्यंकूची शिकवणी' ही कथा सांगितली तर हलडले यांनी मिरासदारांचीच 'माझ्या बापाची पेंड' ही कथा सांगितली. यावरून हे लक्षात आले की जरी या स्पर्धेवर पुण्याच्या विद्यार्थ्यांनी प्रभावी ठसा उमटवला तरी इतर ठिकाणचे विद्यार्थीसुद्धा अतिशय सुरेख पद्धतीने कथा सांगू शकतात व बक्षीसे पटकावू शकतात. या दृष्टीने 'झोप' ही मिरासदारांची गोष्ट सांगणाऱ्या कु. ज्योति पाटीलचा व मिरासदारांची 'माझी पहिली चोरी' सांगणाऱ्या चाळीसगावच्या कु. आठवलेचा अवश्य उल्लेख करावा लागेल. या नावांशिवाय सारडा कॉलेजच्या श्री. हेमंत काळेचा, अहमदनगर कॉलेजच्या श्री. मकरंद खेर वगैरेंचा पण उल्लेख अप्रस्तुत ठरणार नाही. यावरून तसं पाहिलं तर परीक्षकांच्याच शब्दात म्हणता येईल की स्पर्धेचा एकंदर दर्जाच चांगला होता. परंतु कथाकथन स्पर्धासाठी अजूनही सामान्यतः विनोदी कथा व त्याही ग्रामीण विनोदी कथा निवडण्याकडे विद्यार्थ्यांचा कल दिसून येतो व त्यामध्येसुद्धा श्री. द. मा. मिरासदार यांच्या कथांना विशेष प्राधान्य मिळते. या स्पर्धेत त्यांच्याच बहुसंख्य कथा वाचल्या गेल्या.

समारोपप्रसंगी श्री. श्री. ज. जोशी व श्री. बाळ गाडगीळ यांनी स्वतः कथाकथन करावे अशी सूचना जेव्हा त्यांना संयोजकांनी केली तेव्हा दोघांचेही मत पडले की आम्ही जर कथा कथनाचा प्रयत्न केला तर आम्ही उणे पडू. फिके पडू. मुलामुलींनी आम्हाला हरवलंय. परीक्षकांच्या या बोलक्या प्रतिक्रियेपेक्षा वेगळे या स्पर्धेच्या दर्जाबद्दल काय सांगायचे ?

—संयोजक

□ □ 1

 पृष्ठ ८ वरून

परिवर्तन हे जीवनाचे तीन मूलभूत विषय आहेत. जीवनात आधी संकट, विरह, दारिद्र्य येतेच...स्वप्नाच्या कुंचल्याने इश्काचें रंग भरून जीवनाचे चित्र नीट काढले जात नाही. जेथे आत्मसमाधान मिळेल, आत्मप्रचिती जाणवेल व आत्म-प्रतारणा होणार नाही अशा जीवनाचा आपणाला शोध घ्यायचा आहे ... प्रत्येक मनुष्य स्वत:च्या मनाच्या प्रदेशात निर्वासित असतो. अशा वेळी मनुष्य अंतर्मुख होतो आणि अंतर्मुख झाल्यानंतर मग त्याच्या मौनाला अंकूर फुटू लागतात. ह्या वडाच्या, पिंपळाच्या झाडाची ही गुलाबी मुळं. ही मुळं दूरवर कुठपर्यंत खोल गेली आहेत याचा तुम्ही शोध घ्या. या मुळात ताकद असते. भल्याभल्या प्रचंड पत्थराचे स्नायू चिरून ही गुलाबी मुळं जातात. आपण फक्त झाडावरील मोहोर पाहू शकतो. झाडांच्या मुळांपर्यंत आपली नजर जाऊन या मुळातील ताकदीचा अदमास आपणाला करता येत नाही ही आपली लाचारी आहे. आपल्या मनातील नैराश्याची ही पिवळीधम्म पात्रे तुटून पडतील तेव्हाच नव चैतन्याचे अंकुर फुटतील...'

सिरोंचा तालुक्यात भामरागड नावाचे एक घनदाट जंगल आहे. आपल्या जीवनाचा पुढील काळ येथे कंठता यावा ही बाबांची इच्छा आहे. अजूनही आदि मानवाच्या अवस्थेत असलेल्या येथील मानवाच्या संस्कृतीचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने येत्या मार्चमध्ये एक Adventure camp साहस शिबिर घेण्याचा बाबांचा मानस आहे. त्यांनी आम्हाला भामरागडला येण्याचे आवाहन केले–आमंत्रण दिले. 'ते म्हणाले–' सत्याची अनुभूति मिळण्यासाठी नग्न मनाचे दर्शन घेण्यासाठी–अंत्योदयाच्या दर्शनार्थ आपणाला भामरागडला जायचे आहे. या सोमनाथमधील नक–कार्याच्या खांद्यावर उभे राहून एक नवक्षितीज पाहण्यासाठी मी जात आहे. मनाचे नग्न, वास्तव दर्शन तेथे घडेल. Nude Mind. नग्न मनाचे हे सामूहिक चित्र पाहण्यासाठी तुम्ही चला ... जिथे भीती असते तेथे प्रिती नसते आणि भीती ही जीवन जगण्याने नष्ट होते. सोमनाथला तुम्ही dignity of labour शिकायला आलेला असाल तर माझ्या सोबत भामरागडला dignity of danger शिकायला या.'

बाबांचं बोलणं ते काय? काव्याच्या अखंड असलेल्या स्त्रोतासारखे असते ते. आम्ही सर्वचजण त्यांच्या या बोलण्यानी भारावून जायचो. आमच्यातल्या कमी अधिक ३० एक विद्यार्थ्यांनी भामरागडला जायची तयारी दर्शविली. आमच्या शंकांना बाबांनी समाधानकारण उत्तरे दिली.

सोमनाथच्या परिसरात आमच्या मनावर कसली तरी धुंदी चढली होती. निसर्गाच्या या रम्य प्रदेशात आम्हीही अंतर्मुख होऊन विचार करायला लागलो होतो. आमच्याही मौनाला अंकूर फुटायला लागले होते. मन, मनगट आणि मेंदू यांची

ताकद जाणवायला लागली होती. यापूर्वीच्या तीन श्रमसंस्कार छावणीतून उभे राहिलेले सोमनाथाचे भव्य शिल्प आम्ही पाहत होतो. जंगलातून वाट फुटेल तसे भटकत होतो. मन मानील तसे गात होतो. येथे फुलणाऱ्या या श्रम गंगेच्या काठावर उद्या जी समृद्धीची कोठारे बहरणार आहेत–तिची स्वप्न आम्ही पाहत होतो.

वर्कर्स युनिव्हर्सिटी, श्रमिक कार्यकर्ता विद्यापीठ. बाबांनी सोमनाथला पाऊल ठेवले हेच मुळी याकरता. क्रांतिकारी युवाशक्ताचा एक प्रयोग सध्या बाबांनी इथं आरंभलाय. ७–८ तरुण, विविध मनोवृत्तीचे सध्या या प्रोजेक्टवर काम करतात. इथून जातील त्यावेळी जगण्याच्या परिपूर्ण आत्मविश्वासाने ते जातील. ह्यातले कुलकर्णी, दिनानाथ ह्यांच्याशी तर मी खूप बोललो. वाऱ्यावर स्वार होऊन, दैन्याचे सैन्य जिंकण्यासाठी शपथबद्ध असलेले हे तरुण.

अशा या तरुणांच्या साथीत आमचे दिवस जायचे. दिवसभर या मंडळींशी चर्चा. रात्री सांस्कृतिक कार्यक्रमपण आम्ही केलेत. इंदूरकरचे शास्त्रीय गायन; कुरेकारचे बासरीवादन तर फारच बहारदार होते. आमच्या प्राध्यापकांपैकी प्रा. सूरेश मृगुवार यांनीदेखील काही कविता गाऊन दाखवल्या. प्रा. कुरेशी यांनीही एक 'हम तेरा इन्तजार करते है' हे गीत ऐकविले. त्यांचे शेर तर काय–लाजबाब होते. आमच्या एका विद्यार्थी मित्राने तर 'येऊ कशी कशी...' ही झकास लावणी ऐकविली.

दिनांक ५ जानेवारीला राष्ट्रीय सेवा योजनेचे डायरेक्टर कर्नल श्री. दयाल यांनी आमच्या या छोट्याश्या शिबिराला भेट दिली. N. Sc. म्हणजे काय हे त्यांनी चांगले समजावून दिले. त्यांनी फार उचीत मार्गदर्शन केले. येथे आणखी एक वैशिष्टय आम्हाला जाणवले. आमच्या महाविद्यालयाचे व्यासपीठावरील विद्यार्थी वक्ते आमच्या सोबत येथे आले नसतानाही आमचा वादविवाद फारच रंगला. विषय होता. 'सध्याच्या विद्यार्थ्यांच्या अस्थिर-जीवनात राष्ट्रीय सेवा योजनेद्वारा महत्त्वाचे कार्य होऊ शकेल' विषयाची बाजू झिठार, बोबडे, प्रा. उपलेंचवार यांनी फार चांगल्या पद्धतीने मांडली. त्याचा तितकाच जोरदार प्रतिकार विरुद्ध बाजूकडून–श्री. खापने, यन्नूरवार, प्रा. भृगुवार यांनी केला. मध्यंतरी एके दिवशी काही विद्यार्थ्यांनी एकनाथ सरदार पटेल यांच्याविषयी काही गोष्टी सांगितल्या. अंबूलकर या विद्यार्थ्याने प्रो. रॉबर्ट ओपेनहेमर यांच्या जीवनाचे आणि कार्याचे दर्शन घडविले. प्रस्तुत लेखकानेपण सर्वसामान्य विद्यार्थ्यासाठी 'विज्ञानाचा संदेश' या विषयावर काही विचार मांडलेत !

निसर्गाच्या सहवासात आमचे दिवस कसे भरभर निघून गेले. आमच्या आंघोळी इथल्या प्रसिद्ध अशा तीन कुंडावर व्हायच्या. जेवणही मनासारखे. भरपूर. जेवणाची वेळ मात्र कधीच चुकली नाही, येथे हा या जातीचा, तो त्या जातीचा हा भेदभाव कुणीही दाखविला नाही. प्राध्यापकाशी मनमोकळी चर्चा मात्र आम्ही खूप केली. ज्यांच्या घरी २।३ गडीमाणसं आहेत अशी मुलं येथे स्वतःच्या हातानी ताट वाटी

घासत होती आणि 'श्रम ही है श्रीराम हमारा' मनात गुणगुणत होती.

दिनांक ८ तारखेला सुप्रसिद्ध कवी श्री. बाबा मोहोड यांनी आमच्या शिबिराला भेट दिली. दुपारी त्यांचे रसपूर्ण व्याख्यान झाले. त्यांचे व्याख्यान म्हणजे एखाद्या मेजवानीचाच प्रकार होता. आपल्या शेतीवरील विविध प्रयोग त्यांनी आम्हाला फार चांगल्या, सोप्या, सुबोध भाषेत सांगितले. रात्री त्यांनी आपल्या ३।४ कविता पण ऐकविल्या. रसिकांनी त्यांना उस्फूर्त दाद दिली. आमचे लोकप्रिय प्राचार्य रॉय; डॉ. बपोरीकर वगैरे मंडळींनी पण शेवटच्या दिवसात आपली उपस्थिती लावली.

श्रम ज्ञान-मनोरंजनात जात 'असलेले आमचे दिवस लवकरच संपले. ९ तारखेची सकाळ उगवली. महाविद्यालयाच्या वतीने प्रत्येक विद्यार्थ्याला प्रमाणपत्र आणि एक बॉलपेन प्रदान करण्यात आले. आमच्या या निरोप समारंभाचे अध्यक्ष होते श्री. बाबा मोहोड. बाबासाहेब आमटे या निरोपाच्या भाषणात म्हणाले, 'आज आपल्यातली संवेदनक्षमता नष्ट झालेली आहे. आज साऱ्या समाजावरच एक 'थीक स्कीन' thick skin पसरलेली आहे. ह्या 'सीक नर्व्हज' (sick nerves) मुळे हा जो संवेदनक्षमतेचा अभाव जाणवतो तो भयाण आहे...या साऱ्या समाजाविषयी तुम्हाला वाटणाऱ्या तळमळीची कात्री वापरून ह्या सीक नर्व्हज कापून काढा. माकडाचे हात नेहमी तर माकडचेष्टा करतेच. पण तेच हात ज्यावेळी लंकेतल्या रावणाच साम्राज्य भस्मसात करीत असताना फक्त बिभीषणाच घर वाचवतात त्यावेळी ते हात माकडाचे नसून भावनेचे असतात ह्याची खात्री पटते...समाजातील स्थिती पाहून जीवाला उबग येते. आणि हे सारं असताना सत्याचे, ढोंगाचे मुखवटे घालून तुम्ही जगता...या २३ वर्षात स्वराज्य इतके म्हातारे झाले, महाग झाले की माणसाला माणूस म्हणून जगता येत नाही. अतिशय प्रामाणिकपणानं नम्रपणानं काही करायच झाल तर करता येत नाही...आज आपणापैकी सर्वांची मन भग्न आहेत. भंगलेली आहेत. आणि त्याचसाठी आपल्या मनाची प्रथम मशागत व्हायला पाहिजे आहे...म्हणूनच आपणाला भामरागडला जायचे आहे. शेवटी काय...तुम्ही स्वतःला विचारासाठी, आचारासाठी कुठेही गहाण टाकू नका'

आपल्या अध्यक्षीय भाषणात श्री. बाबा मोहोड म्हणाले 'बाबासाहेब आमटे हे वेदना, फुंकर आणि संकल्प यांचा महासागर आहेत. आज बाबांनी समारोप केला नाही तर तुम्हाला निमंत्रण दिले. जीवनाची शुद्धता श्रमाने होते. जेथे व्यथा, वेदना दुःख आहे तेथे जीवनशुद्धीची बीजे सापडतात. मला तुमचा हेवा वाटतो की, तुम्ही बाबांच्या निकट आहात. परंतु निकट असण्यात देखील एक धोका आहे. बाबांची महनीयता आपण ओळखायला हवी. पण आपले वेगळेपण संपवून नव्हे; ते बाबासाहेब आमटे यांनाही आवडणार नाही.'

सोमनाथाचं हे जंगल म्हणजे तरुण-तरुणींना एक आवाहन आहे. येथे चित्रकारांनी यावं आणि शिल्पकारांनीही यावं. कवींनी यावं आणि चित्रकारांनीही आपली 'साधना' येथे करावी, कवि, पत्रकार, चित्रकार, शास्त्रज्ञ या मंडळींनी येथे येऊन समाजाच्या जिर्णोद्धाराचा विचार करायला पाहिजे. या श्रमगंगेच्या तीरावर उभे राहत असलेले उद्याचे हे नवशिक्षण तीर्थ तरुणांना एक प्रेरणादायी ठिकाण ठरत आहे. सामाजिक कार्याची आणि लोकबिरादरीची ही एक प्रयोगशाळा आहे. प्रत्येकाच्या विचारसरणीस आणि कर्तृत्वास येथे वाव आहे. बुद्धीजीवी पांढरपेशाची शुभ्रगंगा, श्रमसाऱ्यांची सावळी यमुना आणि विज्ञानयुगातल्या नवतंत्राची गुप्त सरस्वती यांच्या त्रिवेणी संगमावर सोमनाथाचे हे नवशिक्षण कार्य चालू झालेलं आहे.

नऊ तारखेला आम्ही सोमनाथाचा व्यथित अंतःकरणाने निरोप घेतला. पण या व्यथेतदेखील पुन्हा भामरागडला भेटू ही आशा होती आहे. या मातीत आमच्यावर झालेले संस्कार, आमच्या त्या महारोगी बांधवासमोर आम्हाला स्वतःच्या लाजेचीच वाटणारी लाज...हे सारं आठवले. माळरानात घुमणारी 'राघो'ची हाळी. डोंगरझऱ्यांचा खळखळाट आणि रानपाखरांचा किलकिलाट! सारे सोमनाथचे जंगल आम्हाला निरोप देत होते. बाबा आणि ताई हसतमुखात आम्हाला 'पुन्हा या' म्हणत होते. ज्वाला आणि फुलावर मनःपूत प्रेम करणाऱ्या या जोडप्याने आम्हालाही जीवन जगण्याची दीक्षा दिली होती.

परतीचा प्रवास आम्ही दिनांक ९ ला सुरू केला. मात्र या परतीच्या प्रवासात मला माझे मन बाबांच्या सहवासात काढलेल्या क्षणाची आठवण देत होते. मी व्यथित अंतःकरणाने विचार करत होतो की जर हा सगळा कँप विद्यार्थ्यांवर त्यांच्या स्वतःच्या खर्चाने घेतला असता तर किती विद्यार्थी तयार झाले असते? Each Coward in croud is a brave man या बाबांच्या म्हणण्यानुसार आमच्यापैकी प्रत्येक काम करत होता. पण हेतूविहीन श्रमातून सर्व काही साध्य होईल असं मला वाटत नाही. समाजातल्या सर्व थरातल्या लोकांना एकत्र आणण्याकरिता श्रम हे माध्यम ठीक असले तरी आमचे मूळ दुखणे हे विचाराच्या दौबल्यातच आहे. तसे पाहिले असता तोंडाला फेस येईतो काम करणारे लोक आपणाकडे कमी नाहीत. प्रश्न आहे तो संबंध समाज देशउभारणीसाठी एक दिलाने कसा उभा राहील याचा. त्यासाठी वैचारीक बदल, जीवनाच्या दृष्टीकोनात बदल ह्याची आवश्यकता आहे. नवीन विचाराचे जबरदस्त धक्के देऊन या समाजाला गदगदा हलवायला पाहिजे. त्याचवेळी शरीरश्रमाची किंमत कशी वाढविता येईल हाही विचारपण झाला पाहिजे.

माझी पिढी हे करील का?

□ □ □

शरद गोखले

# खोटेबाई आता जा

## नीटस मांडणी, लोभस भूमिका

प्रेक्षकांच्या आणि समीक्षकांच्या प्रतिक्रियांची फारशी तमा न बाळगता जी मंडळी सातत्याने नाट्यलिखाण करीत आहेत, त्यामध्ये शाम फडके आघाडीवर आहेत. त्यांच्या 'पप्पा पुणेरी मम्मी सोनेरी'चे तीन तेरा वाजल्यानंतर त्यांनी 'खोटेबाई आता जा !' ही नवीन विनोदी नाट्यकृती कल्पना थिएटर्स या संस्थेमार्फत रंगभूमीवर आणली आहे.

नाटकाची कल्पना निश्चितपणे 'Imported' असली, तरी त्यावर शाम फडके यांनी चढवलेला भारतीय साज, मोठा मजेशीर व प्रेक्षकांचे मनोरंजन करणारा आहे. नाटकाची मध्यवर्ती कल्पना सर्वसाधारण नाटकांपेक्षा वेगळी असल्याने या नाविन्यानेही प्रेक्षक खूष होऊन जातो.

नानासाहेब काळे यांचा व्यवसाय डबघाईला आलेला आहे. बाहेरून आब कायम ठेवण्यात मात्र ते यशस्वी झाले आहेत. व्यावसायिक अपयशावर एक तोडगा म्हणून त्यांनी आपली मुलगी आशा हिचे लग्न बापूसाहेब गोरे या यशस्वी व्यावसायिकाच्या मुलाबरोबर ठरवले असून लग्नानंतर काळे व गोरे यांनी एकत्र येऊन व्यवसाय करावा अशी नानासाहेबांची योजना असते. नानासाहेबांच्या घरात लग्नाची एकच गडबड उडाली आहे. आप्तेष्ठ मंडळींची पत्रे येत आहेत आणि अशा या आनंदी वातावरणामध्ये एक अपरिचित बाई घरात प्रवेश करते आणि घर आपलेच असल्याच्या थाटात वावरू लागते. तिच्या आगमनामुळे बिचकलेली मंडळी जरा ठिकाणी येतात न येतात तोच बाई ठणकावून सांगतात, उषा आणि सुरेश यांचे लग्न होणार नाही, असे आपल्याला स्वप्न पडले आहे. वार्ता ऐकून काळे कुटुंबीय हबकून जातात, बाईंची भरपूर निर्भत्सना करतात. पण आपल्याला पडलेल्या स्वप्नदृष्यांचे बाई असे काही पडताळे देतात की काळे कंपनीचा धीर खचतो. नाटकाचा पहिला अंक या स्वप्नप्रत्ययाच्या कल्पनेने मोठा मनोरंजक झाला आहे. प्रथम अंकामध्ये निर्माण केलेली ही गूढता व औत्सुक्य शेवटपर्यंत कायम ठेवण्यात नाटककार शाम फडके चांगले यशस्वी झाले आहेत. त्यामुळे प्रयोगाचा एकत्रित परिणाम चांगला होतो. फडके यांचे संवाद साधे, सोपे

आहेत. भाषेचा बडेजाव नसल्याने सर्वसाधारणपणे मंडळी प्रत्यक्षात जशी बोलतात त्या पद्धतीने संवादलेखन केले गेले आहे.

नाटकाचा प्रयोग यशस्वी होतो, त्याचे मोठे श्रेय कलावंतांना आहे. नानासाहेब काळे यांची भूमिका राजा परांजपे मोठी झकास करतात. तथापि त्यांच्या बोलण्यातील दोष आणि वाढत्या वयामुळे त्यांना होणारा त्रास, यामुळे काही ठिकाणी तरी निश्चितपणे रसभंग होतो. या गुणी कलावंताने आता दौऱ्याची दगदग असलेल्या नाट्यसंस्थांपासून तरी दूर राहावे असे सुचवावेसे वाटते. मम्मीच्या भूमिकेसाठी मूळच्या प्रयोगात असलेल्या विमल राऊत यांच्याऐवजी सौ. पद्मा घोटवडेकर आलेल्या दिसल्या. या बाई फारसा प्रभाव पाडू शकल्या नाहीत. कुमारची भूमिका महेश गोंधळेकर यांनी मन लावून केली. आशा (लता) जुकर व उषा (मंदा देसाई) या दोघींनी आपल्या भूमिका समजून केल्याने प्रयोगाची रंगत वाढली. मंदा देसाईंना स्टेज फिगर नाही, अथवा सौंदर्याची बाजूही मजबूत नाही. तरीही आत्मविश्वास व अभिनयकौशल्य या भांडवलावर त्यांनी मिळविलेले यश कौतुकास्पद म्हणावे लागेल. त्यांच्या जाहिरातीतील विशेषणे जाणवणार नाहीत अशा पद्धतीची त्यांची वेषभूषा पाहून बरे वाटले आणि भूमिकेचा आवही राखला गेला. खोटेबाईंची प्रमुख भूमिका पद्मा चव्हाण झकास करतात. मोहनच्या भूमिकेसाठी अगदीच फडतूस कलावंताची निवड केली होती. आशासारखी फाकडू पोरगी या मोहनच्या प्रेमात पडेल हे पटत नाही. अर्थात प्रेम आंधळे असते असे म्हणून सोडून द्यायचे इतकेच. शाम फडके यांनी लेखनावरच लक्ष केंद्रित करावे, फार तर दिग्दर्शनाच्या दिशेने वाटचाल करावी, तथापि रंगभूमीवर व्यावसायिक कलावंत म्हणून उभे राहण्याचा अट्टाहास करू नये, अशी त्यांची सुरेशची भूमिका पाहून वाटले.

कल्पना थिएटर्सने निर्मितीची बाजू चांगली सांभाळली. नेपथ्याचा बडेजाव नसल्याने निर्मिति खर्चाच्या दृष्टीने बेताची झाली आहे. त्यामुळे दौऱ्यासही सुलभता प्राप्त होईल. पार्श्वसंगीत प्रयोगाची रंगत वाढवण्यास मदत करते. कल्पना थिएटर्सची नवीन कलाकृती, विषयाची नीटस मांडणी आणि कलाकारांच्या लोभस भूमिका यामुळे निश्चितपणे मनोरंजक झाली आहे. ☐

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Biweekly) : 40 Paise : Regd. No. M-H 649


# अग्निपुत्र

वसंत पोतदार

मूल्य : रुपये चौदा

प्रसिद्ध झाले.

पूर्वग्राहकांनी आपल्या प्रती
कार्यालयातून नेण्याची
व्यवस्था करावी.
दुपारी २॥ ते ६

परगावच्या पूर्वग्राहकांच्या प्रती
रवाना करण्यास
सुरुवात झाली आहे.

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०.